





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १३६ * नांदेड * शनिवार, दि. २३ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# 'नीट' पेपरफुटीचे केंद्र महाराष्ट्र!

## ११ पैकी सात आरोपी महाराष्ट्रातील, अजून एक सीबीआयच्या वेटिंग लिस्टवर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** 'नीट' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आणखी एका आरोपीला अटक केली आहे. पुण्यातील मनीषा हवालदार हिला फिजिक्स विषयाची प्रश्नपत्रिका लीक केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात सीबीआयकडून करण्यात आलेली ही आतापर्यंतची ११ वी अटक आहे. तपासादरम्यान मनीषा हवालदार हिने परीक्षेपूर्वी काही विद्यार्थ्यांपर्यंत फिजिक्सची प्रश्नपत्रिका पोहोचवल्याचा आरोप समोर आला आहे.

'नीट' परीक्षा फुटीप्रकरणात सर्वात मोठं कनेक्शन हे महाराष्ट्रात असल्याचं तपासातून समोर आलं आहे. आतापर्यंत या प्रकरणात ११ जणांना अटक करण्यात आली असून त्यापैकी सात आरोपी हे महाराष्ट्रातील आहेत. तर याच प्रकरणात पुण्यातील बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांची तपास यंत्रणेच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे, मात्र त्यांना सीबीआयने अधिकृत अटक केलेली नाही. त्यांना जर अटक झाली तर एकट्या महाराष्ट्रातून ती आठवी अटक असेल.




'नीट' पेपरफुटी प्रकरणी आता सीबीआयकडून मनीषा वाघमारे, मनीषा मांढरे आणि पी व्ही कुलकर्णी या तिघांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. दिल्लीच्या अधिकाऱ्यांकडून तिघांची सीबीआय चौकशी केली जात आहे. या तिघांच्या बँक खात्याची माहिती मिळवण्याचे काम तपास यंत्रणांकडून सुरू असल्याचं कळतं आहे. सोबतच या तिघांच्या संपर्कात पुण्यातील इतर कोणकोणते व्यक्ती होते याचाही सखोल तपास सीबीआयकडून केला जात आहे. दरम्यान, आरोपी शुभम खैरनारला घेऊन सीबीआय अधिकारी नाशिकला अधिक तपासासाठी रवाना झाले आहेत.

लातूर शहरात 'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग आला असून, सीबीआयचे पथक आता तिसऱ्या डॉक्टरांच्या चौकशीसाठी दाखल झाले आहे. जुना औसा रोड परिसरातील एका बीएमएस डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये सीबीआय अधिकारी पोहोचले. संबंधित डॉक्टरांची कागदपत्रे आणि संपर्कांची पडताळणी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वी लातूरमधील दोन डॉक्टरांची चौकशी करण्यात आली होती. त्या चौकशीनंतर तपास यंत्रणांना काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

'नीट' पेपर लीक प्रकरणी महाराष्ट्र हेच पेपरफुटीचं केंद्र असल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. त्यामुळे पेपरफुटीच्या मास्टरमाईंड सोबतच काही हायप्रोफाल पालकही सीबीआयच्या राडारवर आले आहेत. सीबीआयच्या आजवरच्या तपात काही धनाढ्य पालकांनी त्यांच्या मुलांसाठी हे पेपर खरेदी केल्याचं निष्पन्न झालं आहे. त्यामुळे एजन्सी आता अशा सर्व पालकांची यादी तयार करत आहे, ज्यांच्या बँक खात्यांतून शिवराज मोटेगावकर, पी. व्ही. कुलकर्णी किंवा त्यांची सहकारी मनीषा वाघमारे यांच्या खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर झाले होते.

### नीट पेपर लीक प्रकरणात ११ वी अटक

नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून ३ मे रोजी नी यूजी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा पेपर फुटल्याचं समोर आल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली असून आता परीक्षा २१ जून रोजी होणार आहे. 'नीट' यूजी पेपरफुटी प्रकरणाचा तपास आता सीबीआयकडून करण्यात येत आहे. सीबीआयनं पेपरफुटीसंदर्भात चौकशी आणि अटकसत्र सुरु ठेवलं आहे. यात अकरावी अटक करण्यात आली आहे. ही अटक पुण्यातून करण्यात आली असून पुण्यातून मनीषा हवालदार या महिलेला अटक करण्यात आलं आहे.

# भाजप १२, शिवसेना ३ तर राष्ट्रवादी २ जागांवर लढणार

## विधानपरिषदेसाठी महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला!



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुतीचा जागावाटपाचा प्राथमिक फॉर्म्युला अखेर समोर आला आहे. मिळालेल्या विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, ही निवडणूक भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) 'महायुती' म्हणूनच एकत्र लढणार असून, वरिष्ठ नेत्यांमध्ये यावर एकमत झाले आहे. प्राथमिक चर्चेनुसार, भाजप १२, शिवसेना ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांच्या फॉर्म्युल्यावर निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे.

विधान परिषदेच्या एकूण १७ जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून, २२ जून रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार आहे. सध्याच्या राजकीय गणितांनुसार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ पाहता या निवडणुकीत महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी महायुतीच्या समन्वय समितीमध्ये चर्चा सुरू असून याच आठवड्यात जागावाटप पूर्ण केले जाईल, अशी माहिती आहे.

ज्या त्या जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांच्या संख्याबळावर महायुतीच्या नेत्यांमध्ये प्राथमिक चर्चा झाली आहे. ज्या पक्षाची सदस्यसंख्या जास्त, त्या पक्षाचा त्या जागेवर दावा, असे ढोबळ सूत्र ठरवण्यात आल्याची माहिती मिळत आहे. त्यानुसार भाजपच्या वाट्याला सर्वाधिक म्हणजेच १२ जागा येत आहेत. मात्र, काही ठिकाणी पारंपरिक जागांची अदलाबदल देखील केली जाणार आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या अंतिम बैठकीत या फॉर्म्युल्यावर अधिकृत शिक्कामोर्तब होईल.

# भाजप आमदार प्रसाद लाड यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट

## कुणबी-मराठा मंत्रालय स्थापन करा; मनोज जरांगे यांच्या विविध १० मागण्या

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या अनेक महिन्यांपासून एकमेकांवर राजकीय चिखलफेक करणाऱ्या भाजप नेते प्रसाद लाड आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत मनोज जरांगे यांनी कुणबी-मराठा मंत्रालय स्थापन करण्याबरोबरच विविध १० मागण्या केल्या आहेत.

३० मे पासून पुन्हा आमरण उपोषणाला बसण्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी जरांगेंनी दिलेल्या आवाहनाचा स्वीकार करत प्रसाद लाड २२ तारखेलाच अंतरवालीत पोहोचले. यावेळी बोलताना प्रसाद लाड म्हणाले की, मनोज दादांनी २३ तारीख दिली होती, पण मी २२ तारखेलाच आलोय. तुमच्या मनात असलेला द्वेष दूर करायचा होता. मी आमदार किंवा नेता म्हणून नाही, तर समाजाचा एक सामान्य माणूस आणि तुमचा लहान भाऊ म्हणून येथे आलोय. देवेंद्र फडणवीस यांना देखील कधीतरी समजून घेतले पाहिजे. गेल्या ७० वर्षांत कोणत्याच मराठा नेत्याने केलं नाही ते फडणवीसांनी केलं आहे, असे त्यांनी फडणवीस यांची बाजू मांडताना म्हटले. तसेच, मी राजकारणावर धंदा करत नाही, जातीसाठी माती खायला तयार आहे, असे म्हणत ३० मे चे उपोषण मागे घेण्याची विनंती देखील प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांना केली. तर, मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य न झाल्यास राजीनामा देईल, असे देखील प्रसाद लाड यांनी म्हटले.

# तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक निलंबित

**बीड (प्रतिनिधी)–** बीड जिल्ह्यातील भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठकवर अखेर निलंबनाची कारवाई केली आहे.

बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणी दाखल गुन्ह्यात ७ मे रोजी बीडचे माजी जिल्हाधिकारी म्हणून राहिलेल्या अविनाश पाठकला लातूर येथून अटक करण्यात आली होती.

# राज्यात पुन्हा अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## ▶ आयजी, डीआयजी, एसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश
## ▶ डॉ. महेश पाटील अमरावती परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्य पोलीस दलात पुन्हा मोठा प्रशासकीय फेरबदल केला आहे. गृह विभागाने आणखी अनेक वरिष्ठ आयपीएस आणि राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदोन्नतीचे आदेश जारी केले आहेत. हे आदेश पोलीस स्थापना मंडळ क्र. १ च्या शिफारशींनुसार तसेच कायदा-सुव्यवस्था, निवडणूक आचारसंहिता आणि न्यायालयीन निर्देशांचा विचार करून जारी करण्यात आले आहेत. नांदेडचे तत्कालीन पोलीस उपअधीक्षक डॉ. महेश पाटील यांची बदली अमरावती परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक या पदावर झाली आहे.

काही दिवसांपुर्वीच पोलीस अधिकाऱ्यांच्या मोठया प्रमाणात बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यानंतर पुन्हा या मोठ्या फेरबदलामध्ये अनेक महत्त्वाच्या शहरांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे आणि नवी मुंबई यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डीआयजी दर्जाच्या अधिकाऱ्यांमध्ये मोठा फेरबदल करण्यात आला आहे. शिवाजी राठोड यांची नागपूरहून ठाणे शहरात अपर पोलीस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. तर प्रमोद शेवाळे यांची एटीएस पुणे येथून नवी मुंबई गुन्हे शाखेत अपर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. याशिवाय, विनीता साहू यांना एसआरपीएफ मुंबई येथे डीआयजी पदाची जबाबदारी देण्यात आली असून अशोक दुधे यांची ठाणे शहरात अपर पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. आर. राजा यांना पदोन्नती देत अपर पोलीस आयुक्त मुंबई येथे नेमण्यात आले आहे.

इतर महत्त्वाच्या बदल्यांमध्ये शीला साईल यांची मुंबई शहरात डीसीपी म्हणून नियुक्ती करण्यात आली **(पान ३ वर...)**

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्विकारला पदभार

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शुक्रवारी पदभार स्वीकारला. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था शाहुराज हिरे यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारल्यानंतर बँकेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत बँकेच्या प्रशासकीय व आर्थिक कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. तसेच मुख्यालयातील विविध विभागांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणीही केली.




या प्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम, वैधानिक परीक्षक रोहित लोहिया तसेच बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७७-अ (१) (दोन) नुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी विद्यमान संचालक मंडळ निष्प्रभ करून बँकेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे यासाठी जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांची २७ एप्रिल २०२६ रोजी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी पदभार स्वीकारून बँकेचे प्रशासकीय कामकाज सुरू ठेवले होते.

यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई येथील अपर निबंधक तथा सहसचिव यांनी नांदेड जिल्हाधिकारी यांची बँकेच्या प्राधिकृत अधिकारी पदावर नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी २० मे २०२६ रोजी आदेश जारी करून शाहुराज हिरे यांच्या जागी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची नियुक्ती केली.

# कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपकेला जीवे मारण्याची धमकी

**मुंबई (प्रतिनिधी)–** सोशल मीडियात धुमाकूळ घातलेल्या कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपकेला आता जीवे मारण्याच्या धमक्या मिळू लागल्या आहेत. व्हॉट्सॲपवर जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. अभिजितने या संदेशांचे स्क्रीनशॉट ट्विटरवर शेअर केले आहेत. एका संदेशात त्याला भारतीय जनता पक्षात सामील होण्यास किंवा मृत्यूला सामोरे जाण्याची धमकी दिली आहे. यामध्ये अमेरिकेतही मारून टाकू अशी धमकी देण्यात आली आहे. दुसऱ्या एका संदेशात फोन नंबर मिळाल्यामुळे पत्ता शोधायला वेळ लागणार नाही, असेही म्हटले आहे.

# नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज रस्त्यावरील अतिक्रमणावर महानगरपालिकेची कारवाई




**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्यावतीने शुक्रवारी पुन्हा शहरात धडक अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. शहरातील मुख्य रस्ता असलेल्या नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज या मार्गावरील वाहतुकीला अडथळा ठरणारे सर्व अनाधिकृत बांधकामे या कारवाईदरम्यान जमीनदोस्त करण्यात आली आहेत.


सदरील रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नव्याने प्रस्तावित असून भुमी अभिलेख विभागाने दिलेल्या रेखांकनानुसार महापालिका व पोलीस विभगाने संयुक्तपणे ही मोहिम राबविली आहे. या धडक कारवाईमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला या भागातील वाहतुकीचा व रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज रोडवरील नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमणे हटवून नाला पूर्णपणे मोकळा करण्यात आला आहे. शहरातील वर्दळीचा चौक समजल्या जाणाऱ्या नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज दरम्यान असलेल्या मुख्य नैसर्गिक नाल्यावर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमण झाले होते. यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह खंडित होऊन परिसरात पाणी साचण्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. २ जेसीबी, मनपाचे अतिक्रमण पथक आणि पुरेशा पोलीस बंदोबस्तात ही कारवाई पार पडली. या कारवाईमुळे नाल्याचा प्रवाह सुरळीत होऊन रस्त्यावरील वाहतूक कोंडी देखील सुटण्यास मदत होणार आहे.

या कारवाईदरम्यान नमस्कार चौक, आयटीआय कॉर्नर ते थेट एमजीएम कॉलेज पर्यंतचा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला. नाथनगर पाटी ते एमजीएम कॉलेज रस्त्याच्या दुतर्फा असलेले अनाधिकृत शेड, हातगाड्या, फलक आणि दुकानांचे वाढीव बांधकाम पाडण्यात आले व साहित्य जप्त करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात ही मोहीम राबवण्यात आली.

सदरील कारवाई महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वात कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, यापुढे जर कोणी या भागात पुन्हा अतिक्रमण अथवा बांधकाम करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील आणि दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे. ही मोहीम शहरात इतरत्रही अशीच सुरू राहणार आहे.






# विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला मिळाली पाहिजे

## आ. चिखलीकर यांनी पुन्हा केली मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड विधान परिषदेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळाली पाहिजे, अशी मागणी लोहा- कंधार विधानसभेचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी महायुतीच्या नेत्यांकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले.



राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर आ. चिखलीकर प्रसार माध्यमांशी संवाद साधत होते. पुढे ते म्हणाले, विधान परिषदेची नांदेडची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळाली पाहिजे. महायुतीतील तिन्ही पक्षाचे नेते बैठक घेत आहेत. त्याच्यामधून मार्ग निघेल. भाजप, राष्ट्रवादी व शिवसेनेने किती जागा लढायच्या, हा निर्णय होईल. कुठली जागा कोणाला सुटली, त्यानंतरचा तो विषय आहे. वर्तमानपत्रात भाजपला जागा सुटल्याच्या वृत्तावद्दल बोलताना ते म्हणाले की, आणखी कुठली जागा कोणाला सुटली, याचा निर्णय झालेला नाही. संख्याबळ भाजपचे जास्त आहे. संख्याबळाच्या जोरावर ते जर जागा मागत असतील तर राष्ट्रवादी नांदेड जिल्ह्यात दुसऱ्या नंबरवर आहे. कुठेतरी आम्हीसुद्धा एक नंबरवर असू. तेव्हा त्यांना आमची गरज पडू शकते. हे समीकरण महायुतीचे आहे. बैठकीला मी नव्हतो, त्याबद्दल मला माहिती नाही. परंतु समन्वयाच्या भूमिकेतून महायुतीने सर्व जागा लढाव्यात. त्याच्यासाठीचे सूत्र ठरेल. मी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आहे. माझ्या पक्षाला जागा मिळाली पाहिजे ही भूमिका माझी आहे. शेवटी नेतृत्व ठरवेल तो निर्णय मान्य करावा लागेल, असेही यावेळी आमदार चिखलीकर म्हणाले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# 'कॉकरोच अमर रहे!'

लोकशाहीच्या महान रंगमंचावर सध्या एक नवा राजकीय पक्ष जन्माला येण्याच्या चर्चेने खळबळ उडाली आहे. ही पार्टी आहे कॉकरोच जनता पार्टी. नाव ऐकून हसू येईल, पण पक्षाची विचारसरणी पाहिली तर देशातील अनेक प्रस्थापित पक्षांना आरसा दाखवणारी आहे. कारण कॉकरोच अर्थात झुरळ हा प्राणी किंवा कीटक कोणत्याही परिस्थितीत जिवंत राहतो, घाणीमध्ये फोफावतो आणि कितीही फवारणी केली तरी पुन्हा डोके वर काढतो. देशात बेरोजगारीने विक्रमी टप्पा गाठला आहे. लाखो तरुण पदव्या घेऊन फिरत आहेत, पण नोकऱ्या मात्र डेटा अपडेट होत आहेत. त्या सरकारी वेबसाईटसारख्या गायब आहेत. रोजगार मेळावे भरतात, पण तिथे नोकऱ्यांपेक्षा सेल्फी जास्त मिळतात. तरुणांच्या हातात काम नाही, पण नेत्यांच्या भाषणात विकास मात्र ओसंडून वाहतो. हा विकास नेमका कुठे चालला आहे, हे शोधण्यासाठी आता स्वतंत्र तपास यंत्रणा नेमावी लागेल. अशातच देशातील सर्वोच्च घटनात्मक पदांवर बसलेल्या व्यक्तींनी शब्दांचा वापर सावधपणे करणे अपेक्षित असते. राजकीय पक्षांची अवस्था तर आणखी करमणुकीची झाली आहे. निवडणुकीपूर्वी जनता मायबाप असते आणि निवडणुकीनंतर ती फक्त डेटा बनते. गावात पाणी नाही, शेती मालाला भाव नाही, विद्यार्थ्यांना सुविधा नाहीत, रुग्णालयात औषधे नाहीत, पण पक्षांच्या कार्यालयात मात्र एसी, एलईडी स्क्रीन आणि सोशल मीडिया वॉररूम अगदी सज्ज असतात. लोकांच्या प्रश्नांपेक्षा ट्रेंडिंग हॅशटॅग अधिक महत्त्वाचे झाले आहेत. नेते फक्त इव्हेंट मॅनेजमेंट मॅनेजर झाले आहेत का? भ्रष्टाचार तर आता राजकारणाचा अपवाद नसून अधिकृत पात्रता बनली आहे. पूर्वी भ्रष्टाचार उघडकीस आला की नेते लाजायचे; आता पत्रकार परिषद घेऊन उलट चौकशी करणाऱ्यालाच दोषी ठरवले जाते. हजारो कोटींचे घोटाळे हे आता इतके सामान्य झाले आहेत की, जनतेलाही त्याचे आश्चर्य वाटेनासे झाले आहे. प्रामाणिक नेता शोधणे म्हणजे सरकारी कार्यालयात पहिल्याच दिवशी काम किंवा न्यायालयात एकाच सुनावणीत निवाडा होण्याइतके दुर्मिळ झाले आहे. राजकीय नेत्यांची बौद्धिक कुवतही दिवसेंदिवस खालावत चालली आहे. एकेकाळी संसदेत धोरणांवर चर्चा व्हायची; आता वैयक्तिक टोमणे, शिवीगाळ आणि बालिश आरोपांची स्पर्धा सुरू असते. अनेक नेत्यांचे भाषण ऐकले की प्रश्न पडतो की हे लोक राज्य चालवतात की व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीचे वर्ग घेतात? अभ्यास, विचार, तत्त्वज्ञान आणि दूरदृष्टी या शब्दांना राजकारणात आता निवृत्ती मिळाली आहे. नीतिमत्तेची अवस्था तर आणखी बिकट आहे. पक्ष बदलणे, विचार बदलणे, भूमिका बदलणे आणि गरज पडल्यास इतिहासही बदलणे हे कपडे बदलणे इतके सोपे झाले आहे. हे सगळे इतक्या सहजपणे घडते की, आता जनतेलाच स्मरणशक्तीचा त्रास होऊ लागला आहे. काल ज्यांना भ्रष्ट म्हणाले, त्यांच्याच गळ्यात आज हार घातले जातात, त्यांनाच मंत्री केले जाते. अशा अवस्थेत उमेदवारांनी जनतेला दिलेली आश्वासने निवडणूक निकालाच्या दुसऱ्याच दिवशी जुमला बनतात. त्यांना सामान्य गरीब जनतेचे दुःख ऐकून सुद्धा माहीत नाहीत. अशा परिस्थितीत कॉकरोच जनता पार्टी ही कल्पना विनोदी वाटली तरी ती आपल्या लोकशाहीच्या वास्तवावरच भाष्य करते. कारण या व्यवस्थेत टिकून राहण्यासाठी प्रामाणिकपणा नव्हे, तर कॉकरोचसारखी जुळवून घेण्याची क्षमता लागते. जनतेनेही आता फक्त टाळ्या वाजवणारे प्रेक्षक न राहता प्रश्न विचारणारे नागरिक बनण्याची वेळ आली आहे.

# सुरेखा यादव : भारतीय रेल्वेतील पहिली महिला लोकोपायलट






भारतीय समाजात बदलांची चाहूल लागलेली असली, तरी अनेक क्षेत्रांमध्ये महिलांसाठी संधी मर्यादित होत्या. शिक्षण आणि नोकरीच्या क्षेत्रात महिलांची संख्या वाढत होती, परंतु तांत्रिक आणि वाहतूक क्षेत्र अजूनही प्रामुख्याने पुरुषांचे वर्चस्व असलेले मानले जात होते. रेल्वे, बस किंवा इतर यंत्राधारित वाहन चालवणे हे स्त्रियांसाठी कठीण आणि अपारंपरिक काम समजले जात असे. अशा परिस्थितीत एखादी महिला चालक म्हणून पुढे येणे म्हणजे केवळ व्यावसायिक यश नव्हे, तर समाजातील रूढ कल्पना आणि बंधने मोडण्याचे धैर्य दाखवणे होय.

या पार्श्वभूमीवर महिला चालकांचा प्रवास हा प्रेरणादायी ठरतो. त्यांनी आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर पुरुषांच्या बरोबरीने काम करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्यामुळे समाजातील स्त्रीविषयक दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली आणि पुढील पिढ्यांसाठी नवे मार्ग खुले झाले. अशा प्रेरणादायी वाटचालीतून उभ्या राहिलेल्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे सुरेखा यादव, ज्यांनी आपल्या कार्याने भारतीय रेल्वेच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला.

सुरेखा यादव यांचा जन्म २ सप्टेंबर १९६५ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथे सोनाबाई आणि रामचंद्र भोसले यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील शेतकरी होते आणि त्या पाच भावंडांपैकी सर्वात मोठ्या होत्या. लहानपणापासूनच त्यांच्यात जिद्द आणि जबाबदारीची जाणीव होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यातील सेंट पॉल कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये झाले. पुढे त्यांनी कराड येथील शासकीय पॉलिटेक्निकमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा प्राप्त केला. त्यांना पुढे बी. एस्सी. आणि बी.एड. करून शिक्षिका व्हायचे होते; मात्र भारतीय रेल्वेमधील नोकरीची संधी मिळाल्याने त्यांनी हा मार्ग स्वीकारला. १९८६ साली त्या मध्य रेल्वेत प्रशिक्षणार्थी सहायक चालक म्हणून कल्याण येथे रुजू झाल्या. सहा महिन्यांचे कठोर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर १९८९ मध्ये त्या नियमित सहायक चालक बनल्या. त्या काळात रेल्वे गाडी चालवणे हे पूर्णतः पुरुषांचे क्षेत्र मानले जात होते. अशा परिस्थितीत सुरेखा यादव यांनी दाखवलेले धैर्य विशेष उल्लेखनीय आहे.

१९९० मध्ये त्यांचा विवाह शंकर यादव यांच्याशी झाला, जे महाराष्ट्र शासनात पोलीस निरीक्षक आहेत. त्यांना दोन मुले आहेत. कुटुंबाचा पाठिंबा हा त्यांच्या यशामागील महत्त्वाचा घटक ठरला. सुरेखा यादव यांची प्रगती सातत्याने होत राहिली १९९६ : मालगाडी चालक म्हणून नियुक्ती, १९९८ : पूर्णवेळ मालगाडी चालक, २००० : मोटर-वुमन म्हणून पदोन्नती, २०११ : एक्सप्रेस मेल चालक. त्यांनी पश्चिम घाटातील कठीण घाट विभागात दुहेरी इंजिन असलेल्या गाड्या चालवण्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतले. घाट मार्गावर ट्रेन चालवणे हे अत्यंत आव्हानात्मक काम मानले जाते, आणि त्या हे कार्य यशस्वीपणे पार पाडणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. सुरेखा यादव यांच्या नावावर अनेक ऐतिहासिक कामगिरी नोंदवल्या गेल्या आहेत. आशियातील पहिल्या महिला ट्रेन चालक. प्रसिद्ध डेक्कन क्वीन चालवणाऱ्या पहिल्या महिला.

२०२३ मध्ये वंदे भारत एक्सप्रेस चालवणाऱ्या पहिल्या महिला. मुंबई ते लखनौ विशेष सर्व-महिला कर्मचारी असलेली ट्रेन चालवण्याचा मान. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही 'मन की बात' कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा गौरव केला.

सुरेखा यादव यांनी आपल्या सेवाकाळात अत्यंत दक्षता आणि जबाबदारीने काम केले. रेल्वे चालवताना अनेक धोके असतात. यांत्रिक बिघाड, सिग्नल समस्या, अचानक रुळ ओलांडणारे लोक किंवा प्राणी, परंतु त्यांनी प्रत्येक परिस्थितीला शांतपणे आणि तत्परतेने सामोरे गेले. विशेष म्हणजे त्यांच्या नावावर एकही रेल्वे अपघात नोंदलेला नाही, ही त्यांच्या कौशल्याची साक्ष आहे. त्यांच्या यशामुळे अनेक महिलांना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा मिळाली. २०११ पर्यंत ५० हून अधिक महिला लोकोपायलट भारतीय रेल्वेमध्ये कार्यरत झाल्या होत्या. महिलांवरील छेडछाड रोखण्यासाठी त्यांनी विविध उपक्रमांमध्येही सहभाग घेतला.

**पुरस्कार आणि सन्मान**

सुरेखा यादव यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. सुरेखा यादव यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विविध कालखंडांत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या कर्तृत्वाची दखल सर्वप्रथम १९९८ मध्ये जिजाऊ पुरस्काराने घेण्यात आली. त्यानंतर २००१ मध्ये लायन्स क्लबतर्फे महिला कर्तृत्ववान पुरस्कार तसेच राष्ट्रीय महिला आयोग, दिल्ली यांचा सन्मान मिळाला, तर २००२ मध्ये लोकमत सखी मंच पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. पुढील काळात २००३०४ मध्ये एसबीआय प्लॅटिनम ज्युबिली वर्ष सन्मान, २००४ मध्ये सह्याद्री हिरकानी पुरस्कार आणि २००५ मध्ये प्रेरणा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली. त्यांच्या सेवेला राष्ट्रीय स्तरावरही मोठी ओळख मिळाली असून, २०११ मध्ये भारतीय रेल्वेकडून जी. एम. पुरस्कार आणि मध्य रेल्वेतर्फे महिला कर्तृत्ववान पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच २०१३ मध्ये आरडब्ल्यूसीसी सर्वोत्कृष्ट महिला पुरस्कार देऊन त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यात आला. अशा प्रकारे विविध क्षेत्रांतून मिळालेल्या या पुरस्कारांमुळे सुरेखा यादव यांचे कार्य अधिकच उजळून निघाले आहे.

३० सप्टेंबर २०२५ रोजी ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या निवृत्तीच्या वेळी विविध स्तरांवरून त्यांचा गौरव करण्यात आला. उद्योगपती आनंद महिंद्रा यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

सुरेखा यादव यांचा प्रवास हा केवळ एका महिला लोकोपायलटचा नाही, तर स्त्रीशक्ती, जिद्द आणि आत्मविश्वासाचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांनी सिद्ध केले की, कोणतेही क्षेत्र स्त्रियांसाठी बंद नाही. फक्त धैर्याने पुढे जाण्याची गरज असते.त्यांचे कार्य भारतीय रेल्वेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी ते सदैव प्रेरणास्थान राहील.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
संगीत विभाग
पु. अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणी सावरगाव

# जैवविविधता संवर्धन : उद्याच्या पिढीसाठी आजची जबाबदारी

पृथ्वीवरील सर्व सजीवांचे अस्तित्व, त्यांच्यातील विविधता आणि पर्यावरणातील संतुलन यांचे महत्त्व लोकांना समजावे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. वनस्पती, प्राणी, पक्षी, जलचर आणि सूक्ष्मजीव हे निसर्गाचे अमूल्य घटक आहेत. मानवाचे जीवनदेखील या जैवविविधतेवरच अवलंबून आहे.

आज वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि शहरीकरण यांमुळे अनेक जीवसृष्टी धोक्यात आली आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित, सुंदर आणि समृद्ध पर्यावरण मिळावे यासाठी प्रत्येकाने निसर्गरक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. म्हणूनच जैवविविधता संवर्धन : उद्याच्या पिढीसाठी आजची जबाबदारी हा संदेश अत्यंत महत्त्वाचा ठरतो

**जैवविविधता म्हणजे काय?**

पृथ्वीवर असंख्य प्रकारचे सजीव आढळतात. वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक, जलचर तसेच सूक्ष्मजीव यांची असलेली विविधता म्हणजेच जैवविविधता होय. प्रत्येक सजीवाचे जीवन जगण्याचे स्थान, त्यांची जीवनपद्धती आणि निसर्गाशी असलेले संबंध हे सर्व जैवविविधतेचा भाग आहेत. जंगल, नद्या, समुद्र, पर्वत, गवताळ प्रदेश अशा विविध अधिवासांमध्ये अनेक प्रकारचे जीव एकमेकांवर अवलंबून राहून जीवनचक्र पूर्ण करतात. निसर्गातील प्रत्येक जीव पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, पक्षी बियांचा प्रसार करतात, मधमाश्या परागीभवन करतात, तर सूक्ष्मजीव जमिनीची सुपीकता वाढवतात. अन्नसाखळी आणि पर्यावरणीय संतुलन टिकवण्यासाठी प्रत्येक जीव आवश्यक असतो. एखादी प्रजाती नष्ट झाली तर त्याचा परिणाम संपूर्ण पर्यावरणावर होऊ शकतो. जैवविविधता ही मानवासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. अन्न, औषधे, इंधन, कपडे आणि इतर अनेक गरजा निसर्गातूनच पूर्ण होतात. त्यामुळे जैवविविधता ही पृथ्वीची अमूल्य संपत्ती मानली जाते. तिचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

**जैवविविधतेचे महत्त्व**

जैवविविधता ही मानवाच्या जीवनाचा आधार आहे. पृथ्वीवरील सर्व सजीव आणि नैसर्गिक संसाधने यांमुळेच जीवन शक्य झाले आहे. मानवाला आवश्यक असलेले अन्न, औषधे, पाणी आणि स्वच्छ हवा हे सर्व निसर्गातून मिळते. विविध प्रकारच्या वनस्पती आणि प्राण्यांमुळे अन्नसाखळी टिकून राहते तसेच अनेक औषधी वनस्पतींमुळे गंभीर आजारांवर उपचार शक्य होतात. त्यामुळे जैवविविधता ही मानवासाठी अमूल्य संपत्ती आहे. शेती आणि उद्योगधंदे देखील मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहेत. सुपीक जमीन, पाणी, परागीभवन करणारे कीटक आणि योग्य हवामान यांमुळे शेती उत्पादन वाढते. जंगलांमधून लाकूड, औषधी पदार्थ आणि इतर नैसर्गिक साधने मिळतात, ज्यांचा उपयोग अनेक उद्योगांमध्ये केला जातो. त्यामुळे जैवविविधता देशाच्या आर्थिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावते.

**जैवविविधतेला असलेले धोके**

आजच्या आधुनिक आणि वेगवान जीवनशैलीमुळे जैवविविधतेसमोर अनेक गंभीर धोके निर्माण झाले आहेत. मानवाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली जात आहे. नवीन रस्ते, इमारती, कारखाने आणि शहरांच्या विस्तारामुळे अनेक वनक्षेत्रे नष्ट होत आहेत. त्यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास कमी होत असून अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगल नष्ट झाल्यामुळे पर्यावरणातील संतुलन बिघडत आहे.

हवामान बदल हा जैवविविधतेसमोरील आणखी एक गंभीर धोका आहे. तापमानवाढ, अनियमित पाऊस, पूर, दुष्काळ आणि वादळे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत. त्यामुळे अनेक प्राणी आणि वनस्पतींचे नैसर्गिक अधिवास धोक्यात आले आहेत. काही जीवांना बदलत्या वातावरणाशी जुळवून घेणे कठीण जात असल्यामुळे त्यांचे अस्तित्व संकटात आले आहे. जर हे धोके वेळेत रोखले नाहीत, तर भविष्यात पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतात. म्हणूनच जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**संवर्धनाची गरज**

जैवविविधता ही पृथ्वीची अमूल्य संपत्ती आहे. मानवाचे जीवन पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. आज वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि शहरीकरण यांमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. जर आपण आज निसर्गाचे जतन केले नाही, तर भविष्यातील पिढ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागेल. म्हणून सुरक्षित, स्वच्छ आणि समृद्ध पर्यावरण पुढील पिढ्यांना मिळावे यासाठी संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे.

निसर्गाचे रक्षण म्हणजे मानवजातीचे रक्षण होय. स्वच्छ हवा, पाणी, अन्न आणि आरोग्यदायी जीवन यासाठी निसर्ग आवश्यक आहे. जर पर्यावरण नष्ट झाले, तर मानवाचे अस्तित्वही धोक्यात येईल. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षारोपण करणे, प्रदूषण कमी करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

जैवविविधतेचे संवर्धन ही आजची गरज आहे. आपण निसर्ग जपला तरच भविष्यातील जीवन सुरक्षित आणि आनंदी राहील.

**आपण काय करू शकतो?**

जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. छोट्या-छोट्या सवयी आणि कृतींमधून आपण निसर्ग संवर्धनात मोठे योगदान देऊ शकतो.

सर्वप्रथम अधिकाधिक वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, वातावरण शुद्ध ठेवतात आणि पर्यावरणातील संतुलन राखतात. त्यामुळे प्रत्येकाने दरवर्षी किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे. जंगलांचे संरक्षण करणे आणि अनावश्यक वृक्षतोड थांबवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. पाण्याची बचत करणे, वीजेचा अपव्यय टाळणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा मर्यादित वापर करणे ही काळाची गरज आहे. संसाधनांचा अतिरेकाने वापर केल्यास पर्यावरणावर गंभीर परिणाम होतात.

आज प्लास्टिक प्रदूषण ही मोठी समस्या बनली आहे. प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी किंवा पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर करणे गरजेचे आहे. तसेच कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून पुनर्वापराला प्रोत्साहन दिल्यास पर्यावरण स्वच्छ राहण्यास मदत होते. वन्यजीव आणि पर्यावरण संरक्षणाबद्दल जनजागृती करणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकांना जैवविविधतेचे महत्त्व समजावून सांगणे, पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्यास प्रोत्साहित करणे आणि विविध मोहिमांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी या कार्यात पुढाकार घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. अशा छोट्या प्रयत्नांमुळे आपण जैवविविधतेचे रक्षण करू शकतो आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित व सुंदर पर्यावरण निर्माण करू शकतो.

**विद्यार्थ्यांची भूमिका**

जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असल्यामुळे त्यांच्या सवयी आणि कृती समाजावर सकारात्मक परिणाम घडवू शकतात. लहान वयातच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात निसर्गसंवर्धनाचे कार्य अधिक प्रभावीपणे होऊ शकते.

पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे हीदेखील विद्यार्थ्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे. पाण्याची बचत करणे, वीजेचा अपव्यय टाळणे, कापडी पिशव्यांचा वापर करणे आणि कागदाचा योग्य वापर करणे अशा छोट्या सवयींमुळे पर्यावरणाचे संरक्षण होऊ शकते. तसेच सायकलचा वापर किंवा सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग केल्यास प्रदूषण कमी होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी जैवविविधतेबद्दल इतरांना माहिती देणेही गरजेचे आहे. मित्र, कुटुंब आणि समाजामध्ये निसर्गसंवर्धनाचे महत्त्व समजावून सांगून जनजागृती करता येते. शाळांमध्ये पर्यावरणविषयक उपक्रम, भाषणे, पोस्टर स्पर्धा आणि रॅली यांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढू शकतो.


थोडक्यात,जैवविविधता ही पृथ्वीची खरी आणि अमूल्य संपत्ती आहे. पृथ्वीवरील प्रत्येक सजीव निसर्गाच्या संतुलनासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. मानवाचे जीवन अन्न, पाणी, हवा आणि इतर नैसर्गिक संसाधनांसाठी पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे.

आज वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदल यांमुळे अनेक जीवसृष्टी धोक्यात आली आहे. जर आपण वेळीच योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतात. म्हणूनच निसर्गाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वृक्षारोपण, पाण्याची बचत, प्लास्टिकचा कमी वापर आणि पर्यावरणपूरक सवयी यांमधून आपण जैवविविधतेचे संवर्धन करू शकतो.

निसर्ग आणि मानव यांचे नाते अतूट आहे. निसर्ग सुरक्षित असेल तरच मानवाचे जीवन सुरक्षित राहील. त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणासाठी जागरूक राहून सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. आज आपण निसर्ग जपू, तर उद्या निसर्ग आपल्याला जपेल.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# जागतिक कासव दिन



२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे. पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे.

आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे.

कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उद्देश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सक्षम व आनंदी व्हावे -सीईओ मेघना कावली

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सुखकर भविष्यासाठी जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या सेवाकाळात शासनामार्फत समाजासाठी महत्त्वपूर्ण कामे केलेली असून, त्यांची सेवा ही शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली आहे. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांचे आर्थिक, सामाजिक तसेच आरोग्यदृष्ट्या जीवन अधिक सक्षम व सुखकर व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी गुरुवार, दिनांक २१ मे रोजी आयोजित प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, एसबीआयचे मुख्य व्यवस्थापक चव्हाण, व्यवस्थापक सतीश राऊत, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे त्या म्हणाल्या की, एखाद्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्ती स्वीकारणे हे सहज सोपे नसते. अनेक वर्षे नियमित कार्यालयीन कामकाज, सेवा व जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर निवृत्तीनंतर अचानक जीवनशैलीत बदल होतो. अशावेळी आता पुढे काय हा प्रश्न अनेकांना पडतो? मात्र, सेवानिवृत्ती हा प्रत्येक लोक सेवकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून, त्यानंतरचे जीवनही सकारात्मक, निरोगी आणि आनंदी पद्धतीने जगता आले पाहिजे. अनेकदा निवृत्तीनंतर मानसिक आणि शारीरिक बदल जाणवतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे जीवन अधिक सुखकर व्हावे, ही जिल्हा परिषदेची जबाबदारी समजून या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने करण्यात आली. त्यानंतर दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त उपस्थितांनी शपथ घेतली. तसेच कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भातील माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांनी आपल्या आवडी जोपासाव्यात असे सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक वित्त अधिकारी विशाल हिवरे यांनी केले तर सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रशिक्षण शिबिराला सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात

## प्रमुख व्याख्याते डॉ. भारती मढवई यांनी युवकांना दिला स्वराज्य विचारांचा संदेश



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** छावा मराठा संघटना महाराष्ट्र, शाखा कुंडलवाडीच्या वतीने आयोजित स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व व्याख्यान हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला शिवप्रेमी बांधव, युवक, माता-भगिनी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

यावेळी प्रास्ताविक छावा मराठा संघटनेचे कुंडलवाडी शहराध्यक्ष प्रा. डॉ. माधव हळदेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणाऱ्या ओजस्वी घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. दीप प्रज्वलन करून राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जिजाऊ वंदना करण समेटवार यांनी गायली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून छावा मराठा संघटनेचे संघटक प्राचार्य डॉ. कमलाकर कणसे, छावा मराठा संघटनेचे प्रवक्ते प्रा. डॉ. प्रभाकर जाधव, साईनाथ गोविंद उत्तरवार, राजेश्वर गोविंद उत्तरवार, दिनेश पंढरीनाथ दाचावार, डॉ. प्रशांत सब्बनवार, रमेश इरलावार, नगरसेविका प्रतिनिधी राहुल सब्बनवार, अशोक गायकवाड, शिवराज पाटील चोळाकेकर तसेच माजी नगराध्यक्ष भुमना काका ठक्कूरवार, प्रा. सतीश पवार, नरेश ठक्कुरवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी व्याख्याते डॉ. भारती मढवई यांचे ओजस्वी व्याख्यान. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज : काल, आज आणि उद्या या विषयावर झाले. याप्रसंगी बोलताना त्यांनी संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग, धर्मनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती यांचा सखोल इतिहास उपस्थितांसमोर मांडला. युवकांनी स्वराज्याचा इतिहास जाणून समाजकार्यात पुढे यावे, असे आवाहनही केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि जोशपूर्ण भाषणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी अध्यक्षीय मनोगतात कुंडलवाडी शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व उद्यान स्वरूपातील प्रेरणास्थळ उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच छत्रपती संभाजी महाराजांचा विचार व वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात दहावीतील गुणवंत विद्यार्थी पालकांसमवेत सत्कार, कुंडलवाडी शहरातील सर्व पत्रकार बांधवांचा सन्मान तसेच नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचाही सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम शिवमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# किनवट नगर परिषदेतील तत्कालीन १.३५ कोटींच्या संशयास्पद व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील नगर परिषदेमधील सुजल व निर्मल जल अभियान या लेखाशिर्षातून तब्बल १ कोटी ३५ लाख ७३ हजार ४६३ रुपयांचा संशयास्पद आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करीत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व विशेष लेखापरीक्षण (ऑडीट) करण्याची मागणी पालिकेतील राष्ट्रवादीचे माजी गटनेते झहिरोद्दीन खान पठाण यांनी केली आहे.

यासंदर्भात सहायक जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधिताना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी किनवट नगर परिषदेच्या विशेष सभेमध्ये सुजल व निर्मल जल अभियान या निधीतील आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर चर्चा झाली होती. तत्कालीन नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेमध्ये भारतीय स्टेट बँकेतील नगर परिषदेच्या दोन खात्यांमधून एकूण १ कोटी ३५ लाख ७३ हजार ४६३ रुपये खर्ची पडल्याचे उघड झाले होते. त्यामध्ये खाते क्रमांक ६२१६९००४३६५ मधून दि. १७ मार्च २०२२ रोजी ७६ लाख २५ हजार ३६४ रुपये तर खाते क्रमांक ६२१०४५३७३८८ मधून ५९ लाख ४२ हजार ९ रुपये खर्ची पडल्याचे नोंदीत नमूद असल्याचे निवेदनात म्हटले आहे. विशेष म्हणजे, ही रक्कम न्यायालयीन आदेशाच्या नावाखाली खर्ची पाडण्यात आली असल्याचे सांगण्यात आले असले, तरी या व्यवहाराची माहिती तत्कालीन मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक अथवा नगर परिषद प्रशासनाला देण्यात आली नव्हती. एवढेच नव्हे, तर धनादेश वठल्यानंतर तब्बल पाच महिन्यांपर्यंत संबंधित लेखापाल व रोखपाल यांनी ही बाब प्रशासनापासून लपवून ठेवल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणात तत्कालीन नगर परिषद विधिज्ञ ॲड. धनकोट, तत्कालीन लेखापाल बिराजदार तसेच तत्कालीन रोखपाल सय्यद अझहर अली यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त करण्यात आला आहे. न्यायालयीन कामकाजात वेळोवेळी पाठपुरावा न करणे, प्रशासनाला माहिती न देणे तसेच आर्थिक व्यवहार गोपनीय ठेवणे या सर्व बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# हदगाव शहरातील पट्टाभिषेक वर्धापन दिन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

## राजकीय, सामाजिक क्षेत्रासह भक्त मंडळींची उपस्थिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव शहरातील महादेव मंदिराचे शिवचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात मंगळवार, दि. १९ मे ते २१ मे या तीन दिवसात अधिक मासानिमित्त पट्टाभिषेक वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त दररोज सकाळी श्री शिवयोगी बसवलिंग महास्वामीजी यांच्या संजीवन समाधीस रुद्राभिषेक, शिवपाठ, विश्वशांती रुद्रयाग स्वाहाकारनंतर श्री महादेव मंदिर ते कार्यक्रम स्थळ हदगाव शहरातील कस्तुरी मंगल कार्यालय रुद्रकलश मिरवणूक सपन्न झाली. त्यानंतर ग्रंथराज परमरहस्य पारायण व महाप्रसाद संपन्न झाला.

गुरुवार, दि. २१ मे रोजी उज्जैन नगरीतील श्रीमद जगद्गुरू श्रीश्रीश्री सिध्दलिंग राजदेशी केंद्र शिवाचार्य महास्वामीजींचे हत्तीवरून मिरवणुकीने स्वागत करण्यात आले. यावेळी वेदांताचार्य शिवाचार्य सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डा, महंत गोपाल गिर महाराज, गुरु बाल व्यंकटस्वामी महाराज पिंपळगाव, गुरू दिगांबर शिवाचार्य महाराज वसमत, गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज चिल्लरगी, रुद्रमणी शिवाचार्य महाराज मुदखेड, भदंत दयानंद महाथेरो मुळावा, गुरु सिध्दलिंग शिवाचार्य महाराज देवणी, गुरु प्रभुलिंग शिवाचार्य महाराज शिरड शहापूर, गुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज पाथरी, प. पू. योगीराज महाराज हदगाव, विरागोदास महाराज शिवपुरी, गुरु गंगेश्वर महाराज, गुरु मुक्तीनाथ महाराज, गुरु माहेश्वरी टाकराळा, गुरु गजानन महाराज आर्णी, गुरु मन्ना महाराज नांदेड, गुरु लक्ष्मण महाराज हंगरगेकर, गुरु बंडू बाबा वांरगा महानुभाव पंथासह आजूबाजूच्या जिल्ह्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत शहरातून मिरवणुकीनंतर धर्मसभेत गुरुवर्यानी आपापले विचार व्यक्त केले. तसेच अनेकांनी शिवचैतन्य शिवाचार्य महाराजांच्या कार्याचे कौतुक केले.

या सोहळ्यानिमित्त हदगाव-हिमायतनगरचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी महादेव मंदिराला तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्तीसह विविध कार्यासाठी आवश्यक सभागृहासह मंगल कार्यालयास निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या सोहळ्यानिमित्त नांदेडच्या माजी महापौर शैलेजा स्वामी, उमरखेडचे आमदार किशनराव वानखेडे, नगराध्यक्षा रोहिणी वानखेडे, निधी भुतडा उमरखेड, कृष्णा पाटील आष्टीकर यांच्यासह राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती होती. हा सोहळा यशस्वीतेसाठी हदगांव तालुक्यासह परिसरातील भक्त, सेवेकरी मंडळींनी परीश्रम घेतले. प्रास्ताविक शिवचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी केले. सूत्रसंचालन संदेश चोंढेकर, प्रा. डॉ. साईनाथ चंदापुरे यांनी केले तर आभार श्रीकृष्ण मंदिराचे गुरुवर्य योगीराज महाराज यांनी मानले.

**पान १ वरून...**

**राज्यात पुन्हा अनेक वरिष्ठ पोलीस...**

आहे. बाळासाहेब पाटील, विवेक पानसरे आणि निलेश सोनावणे या अधिकाऱ्यांची ठाणे शहरात बदली करण्यात आली आहे. श्रीकांत परोपकारी यांच्याकडे तटीय सुरक्षा विभागाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच रविंद्र परदेशी यांची एसआरपीएफ गट-१ पुणे येथे समादेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ग्रामीण आणि इतर जिल्ह्यांमध्येही गृह विभागाने नवीन नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये प्रकाश जाधव यांची छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. तर विनय राठोड यांची ठाणे ग्रामीण येथे बदली करण्यात आली आहे. संभाजी कदम यांना एटीएस पुणे येथे एसपी म्हणून जबाबदारी देण्यात आली असून, विवेक पाटील यांच्याकडे सीआयडी पुणेची धुरा सोपवण्यात आली आहे.

तसेच संजय सरगुंडा पाटील आणि अमोल झेंडे यांची मीरा-भाईंदर, वसई-विरार येथे डीसीपी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विक्रांत देशमुख यांची पिंपरी-चिंचवड येथे बदली झाली आहे. प्रीती टिपरे यांची एफडीए मुंबई येथे सहआयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर हिंमत जाधव यांच्याकडे पुणे येथे नार्कोटिक्स टास्क फोर्सची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान, या मोठ्या बदल्यांच्या प्रक्रियेत काही अधिकाऱ्यांच्या पूर्वीच्या बदली आदेशांना प्रशासनिक कारणास्तव स्थगिती देण्यात आली आहे. यामध्ये कुमार चिंथा, नित्यानंद झा, अकबर पठाण आणि दीपक गिऱ्हे यांच्या बदली आदेशांमध्ये ऐनवेळी बदल करण्यात आले आहेत, अशी माहिती गृह विभागाच्या आदेशात देण्यात आली आहे.

# पशुसंवर्धन दिन विविध उपक्रमांनी साजरा

**नांदेड (प्रतिनिधी) –**पशुसंवर्धन विभाग नांदेड व महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटना शाखा नांदेडच्या संयुक्त विद्यमाने २० मे रोजी पशुसंवर्धन दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी जिजाई ब्लड बँक नांदेडच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात ३७ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला. तसेच पशुमधील अनियमित माज व वंध्यत्व निवारण या विषयावर तांत्रिक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.

कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळ विरोधी प्रतिबंध अधिनियम या विषयावर जिल्हा बाल विकास अधिकारी कैलास तिडके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यातील नवनियुक्त सहायक आयुक्त पशुसंवर्धन तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पशुवैद्यकांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या कार्याचे कौतुक करत नांदेड जिल्ह्यात दूध उत्पादन वाढीसाठी विभागाने अधिक प्रभावीपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन लातूर विभाग डॉ. राजकुमार पडिले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड संदीप माळोदे तसेच जिल्हा बाल विकास प्रकल्प अधिकारी कैलास तिडके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सखाराम खुणे, डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. निरंजन बागल तसेच महावेट कार्यकारिणी नांदेड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करा; आयुक्त पशुसंवर्धन यांचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत.

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

# क्रॅक डाऊन मोहिमेअंतर्गत ६२ गोवंशाची सुटका



**नांदेड (प्रतिनिधी)–** तोंडावर आलेल्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्हा व शहरात गोवंश कत्तल होणार नाही यासाठी संबंधित यंत्रणेला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सतर्क केले आहे. जागोजागी नाकाबंदी दरम्यान गोवंशाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. यातच पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड आणि विलास पवार यांच्या पथकांनी इतवारा आणि मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल ६२ गोवंशाची सुटका केली. यात मुक्रमाबाद ठाण्यात तिघांविरुद्ध तर इतवारा ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येऊ घातलेल्या बकरी ईदच्या संदर्भात कुर्बानी देण्यासाठी मोठ्या प्रमाणात गोवंशाची कत्तल होण्याची शक्यता असल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सर्व ठाणेदारांना सक्त सूचना देऊन गौवंशाची आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत कत्तल होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आदेश दिले. एवढेच नाही तर त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड आणि मुक्रमाबाद ठाण्यात कार्यरत पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांचे दोन पथक तयार करून गोवंश विक्री करणाऱ्यांचे मनसुबे उद्ध्वस्त करण्यासाठी तैनात केले.

यावेळी रमेश गायकवाड यांनी शहराच्या रहेमतनगर, महमदिया कॉलनी, देगलूर नाका परिसरात गफूर कुरेशी शेख रहीम (वय ५२) याला ताब्यात घेऊन त्याच्या तावडीतून १८ गोवंश जप्त केले. हे सर्व गोवंश कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आले होते. रमेश गायकवाड यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात गफूर कुरेशीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर तिकडे दुसऱ्या कारवाईत मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुखेड ते परतूर रस्त्यावर पोलीस उपनिरीक्षक विलास पवार हे आपल्या पथकासह गस्त घालत असताना त्यांनीही ४४ गोवंश पकडले. यावेळी रफिक गौससाब कुरेशी (वय ४५), अहमद शिकुरसाब कुरेशी (वय ३२) आणि उस्मान शिकुरसाब कुरेशी (वय ३५) तिघे राहणार मुक्रमाबाद यांना अटक केली. दोन्ही पथकाने जवळपास १८ लाख १५ हजार रुपयांचे गोवंश जप्त करून चारा-पाण्यासाठी सुरक्षित गोशाळेत रवाना केले आहेत.

**अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या चार गोवंशाची सुटका**

राज्यात गोवंशाच्या कत्तलीला बंदी असताना कायद्याचे सर्रास उल्लंघन करत काही गो माफिया मोठ्या प्रमाणात तस्करी करतात. अशाच एका कारवाईत तामसा पोलिसांनी दोन पिकअप वाहनांचा पाठलाग केला आणि त्यांना पकडून चार गोवंशाला जीवदान दिले. या प्रकरणी पोलिसांनी माधव गणेश काचले, रूकमाजी गणेश काचले दोघे रा. वानवाडी ता. हदगाव, लक्ष्मण घुलप्पा देवकते आणि बाबू पिरबा घीळगंडे दोघे रा. वाकी ता. मुदखेड या चार जणांना ताब्यात घेतले. दोन्ही वाहनांची चौकशी केली असता त्यात क्रूरपणे वागणूक देऊन कोंबवून गोवंशाची वाहतूक करत होते. संबंधित गोवंशाबाबत माहिती विचारली असता त्यांच्याकडे कुठलाही पुरावा व माहिती नव्हती. यावेळी पोलिसांनी गोवंशाला ताब्यात घेऊन गोशाळेत दाखल केले. पोलीस उपनिरीक्षक बालाजी नरवटे यांच्या फिर्यादीवरून वरील चार जणांविरुद्ध तामसा पोलीस ठाण्यात प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार गायकवाड करत आहेत.

# जनगणनेचे काम तालुक्यात सर्वात आधी पूर्ण केल्याबद्दल शिक्षक मलिक चव्हाण यांचा दिल्लीच्या जनगणना पथकाने केला गौरव



**किनवट (प्रतिनिधी)–** भारत सरकारच्या डिजिटल जनगणना अभियानांतर्गत किनवट शहरात जनगणनेचे कार्य वेगाने सुरू आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.शहरात सध्या एकूण ६ पर्यवेक्षक आणि ४३ प्रगणक कार्यरत असून, अत्यंत कडक उन्हातही कर्मचारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत.

मे महिन्यातील तब्बल ४४ ते ४५ अंश सेल्सिअस तापमानातही जनगणना कर्मचाऱ्यांनी कामाची गती कायम ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील सर्कल क्र.०१, HBL - ०६ अंतर्गत कार्यरत प्रगणक अब्दुल मलिक अब्दुल शब्बीर चव्हाण यांनी उल्लेखनीय कामगिरी करत किनवट तालुक्यात सर्वप्रथम जनगणनेचे कार्य पूर्ण करण्याचा मान मिळविला आहे. प्रगणक मलिक चव्हाण यांनी चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे तसेच सर्कल पर्यवेक्षक मल्लिकार्जुन स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत १३२ इमारतींमधील १५८ घरांची डिजिटल जनगणना पूर्ण केली. कमी वेळेत अचूक व शिस्तबद्ध पद्धतीने काम पूर्ण केल्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे व पर्यवेक्षक मल्लिकार्जुन स्वामी यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाला याबाबत माहिती दिली आहे.

तसेच दि. २१ मे रोजी भारत सरकार जनगणना कार्यालयाचे पथक किनवट दौऱ्यावर आले असता डिजिटल जनगणनाचे जॉईंट डायरेक्टर शर्मा, असिस्टंट डायरेक्टर बी. प्रसाद व पांडे डिस्ट्रिक्ट कोओरडीनेटर नेहाल, लतीफ पठाण यांच्या हस्ते अब्दुल मलिक शब्बीर चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. डिजिटल पद्धतीने जनगणना कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी किनवट शहरातील प्रगणक आणि पर्यवेक्षक अहोरात्र मेहनत घेत असून, नागरिकांनीही जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


# पट्ट्याचा तांडा येथे शेतकरी आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने नैराशेतून आपल्या राहत्या घरी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २० मे रोजी दुपारी साडेबारा वाजता कंधार तालुक्यातील पट्ट्याचा तांडा येथे घडली.

पट्ट्याचा तांडा येथील शेतकरी भगवान गणू राठोड (वय ३५) यांच्या शेतात मागील काही वर्षापासून सततची नापिकी होत होती. त्यामुळे ते कर्जबाजारी झाले. बँकेच्या कर्जाचा बोजा वाढत गेला. कर्जाची परतफेड कशी करायची, संसाराचा गाडा कसा हाकायचा या विवंचनेत मागील काही दिवसांपासून तो वावरत होता. अखेर त्याने २० मे रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास आपल्या राहत्या घरी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही माहिती गणू चतुर राठोड यांनी कंधार पोलिसांना दिली. कंधार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या



# एक्स्टेंशन बोर्डमध्ये किती प्लग लावाल?

## लोड वाढल्यास तुमचे घर होईल खाक... सरकारी सल्ला जाणून घ्या...

**एक्स्टेंशन बोर्ड प्रत्येक घरात वापरले जातात, परंतु फार कमी लोकांना हे माहीत आहे की एक्स्टेंशन बोर्डवर क्षमतेपेक्षा जास्त भार टाकल्यास शॉर्ट सर्किट आणि आग लागण्याचा धोका असतो. म्हणूनच एक्स्टेंशन बोर्डमध्ये जास्त प्लग न लावण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे प्रश्न निर्माण होतो, की एक्स्टेंशन बोर्डमध्ये किती प्लग लावणे सुरक्षित आहे?**

कोणत्याही एक्स्टेंशन बोर्डवर किमान तीन ते चार प्लगसाठी जागा असते. मात्र केवळ बोर्डवरील प्लगची संख्याच महत्त्वाची नसते, तर बोर्डवर येणारा भार (लोड) देखील महत्त्वाचा असतो. एक्स्टेंशन बोर्ड वापरताना त्याची एकूण अँपिअर क्षमता आणि उपकरणांचे वॅटेज विचारात घेणे महत्त्वाचे आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, तुम्ही एकाच वेळी कमी क्षमतेची चार उपकरणे जोडू शकता, परंतु जास्त भार असलेले एकच उपकरण संपूर्ण बोर्ड उडवण्यासाठी पुरेसे आहे. अशा परिस्थितीत प्लगच्या संख्येवर नव्हे, तर भारावर (लोडवर) लक्ष केंद्रित केले पाहिजे.

### लोडवर लक्ष केंद्रित करा...

कोणताही एक्स्टेंशन बोर्ड खरेदी करताना, त्याची लोड क्षमता किंवा वॅटेज विचारात घ्या. घरांमध्ये वापरले जाणारे सामान्य एक्स्टेंशन बोर्ड जास्तीत जास्त 1000W ते 1500W पर्यंतचा भार हाताळू शकतात. जर तुम्ही मोबाईल चार्जर, लॅपटॉप किंवा टीव्ही यांसारखी चार कमी शक्तीची उपकरणे जोडली, तर एकूण लोड जेमतेम 200W-300W असेल. कोणताही बोर्ड इतका भार सहजपणे हाताळू शकतो. दुसरीकडे, एक्स्टेंशन बोर्डवर जास्त भार टाकल्यास तो जळू शकतो किंवा घरात शॉर्ट सर्किट किंवा आग देखील लागू शकते.

### जड उपकरणे दूर ठेवा

जड उपकरणे एक्स्टेंशन बोर्डपासून दूर ठेवली पाहिजेत. उदाहरणार्थ, एक इलेक्ट्रिक किटली 1500W भार घेते, तर गीझर 2000W पर्यंत भार घेतो. त्याचप्रमाणे रूम हीटर, वॉशिंग मशीन, रेफ्रिजरेटर, मायक्रोवेव्ह आणि इस्त्री यांनाही खूप वीज लागते. जर यापैकी एक जरी उपकरण एक्स्टेंशन बोर्डला जोडले, तर ते बोर्डच्या निर्धारित वीज मर्यादेपेक्षा जास्त होते. यामुळे तारा त्वरित गरम होतात, इन्सुलेशन जळते आणि गंभीर शॉर्ट सर्किट किंवा आगीचा धोका निर्माण होतो.

### एक्स्टेंशन बोर्ड कसा वापरावा?

एक्स्टेंशन बोर्ड वापरण्यापूर्वी बोर्डच्या किंवा त्याच्या बॉक्सच्या मागील बाजूस लिहिलेले रेटिंग वाचण्याची खात्री करा. या बोर्डांचे रेटिंग सामान्यतः ६ अँपिअर (6A) असते. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की व्होल्ट आणि अँपिअरचा गुणाकार केल्यास एकूण वॅटेज मिळते. भारतात २२० व्होल्टचा वीजपुरवठा आहे, याचा अर्थ असा की 6A बोर्ड केवळ १३२० वॅट्सपर्यंतचा भार हाताळू शकतो. जेव्हा तुम्हाला ही क्षमता माहित असेल, तेव्हा तुम्हाला कळेल की कोणती उपकरणे लावावीत आणि कोणती टाळावीत. सरकारी सल्ल्यानुसार सावधगिरी बाळगावी, उपकरणांच्या वॅटेजची बेरीज करावी आणि बोर्डवर त्याच्या क्षमतेच्या केवळ अर्धाच भार टाकावा.

# स्मार्टफोन 'ओव्हरहीट'चे प्रकार वाढले!

## उन्हाळ्यात ओव्हरहीट होण्यापासून रोखण्यासाठी 'या' सेटिंग्ज बदला...

**सध्या इतके उष्ण वातावरण आहे, की मोबाईल फोनला स्पर्श केल्यावर अक्षरशः चटके बसत आहेत. जणू त्याला ताप आला आहे. ओव्हरहीटिंगची ही समस्या उन्हाळ्यात अधिक सामान्य आहे. ओव्हरहीटिंगमुळे मोबाईल फोनचा स्फोट झाल्याच्या किंवा फुटल्याच्या घटनाही घडल्या आहेत. तुमचा मोबाईल फोन ओव्हरहीट होण्यापासून कसा रोखायचा, हे जाणून घेऊया... उन्हाळ्यात उष्णतेपासून स्वतःचे संरक्षण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आपल्या मोबाईल फोनला जास्त गरम होण्यापासून वाचवणेही महत्त्वाचे आहे.**



### मोबाईल जास्त गरम होण्याची कारणे...

- कडक उन्हात किंवा तापलेल्या गाडीत मोबाइल सोडणे
- दीर्घकाळ व्हिडिओ रेकॉर्डिंग किंवा गेमिंग करणे
- एकाच वेळी अनेक ॲप्स चालू ठेवणे
- खराब नेटवर्कवर सतत इंटरनेट वापरणे
- फास्ट चार्जिंग करताना फोन वापरणे
- जुना किंवा स्थानिक चार्जर वापरणे
- स्टोरेज जवळपास पूर्ण भरलेले असणे
- सॉफ्टवेअर अपडेट नसणे

### या गोष्टी लक्षात ठेवा...



- चार्जिंग करताना तुमचा फोन वापरू नका
- जर तो जास्त गरम होत असेल, तर मागचे जाड कव्हर काढा
- बॅकग्राउंड ॲप्स बंद करा
- नेटवर्क कमकुवत असल्यास डेटा बंद करा
- तुमचा फोन रेफ्रिजरेटर किंवा बर्फाजवळ ठेवू नका
- स्टोरेज मोकळे ठेवा

### न वापरलेल्या फोनपासून धोका...

घरात ठेवलेले जुने आणि न वापरलेले मोबाईल फोन देखील धोकादायक ठरू शकतात. विशेषतः जर फोनची बॅटरी जुनी, फुगलेली किंवा खराब झाली असेल, तर उष्णता, ओलावा किंवा दीर्घकाळ न वापरल्यामुळे आग लागण्याचा किंवा स्फोट होण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे, असे फोन उष्ण ठिकाणी ठेवणे टाळा, त्यांची वेळोवेळी तपासणी करा आणि खराब बॅटरी असलेली उपकरणे सुरक्षित ई-कचरा विल्हेवाट केंद्रात टाकणे सर्वोत्तम आहे.

### तर होतेय बॅटरी खराब



जर फोन वापरात नसतानाही वारंवार जास्त गरम होत असेल, बॅटरी फुगत असेल किंवा तो वारंवार बंद पडत असेल, तर ही बॅटरी खराब होण्याची चिन्हे असू शकतात.

### या सेटिंग्जमुळे फोन होणार नाही गरम...

- अँड्रॉइडसाठी : ब्लूटूथ आणि वाय-फाय स्कॅनिंग बंद करा. सेटिंग्जमध्ये जाऊन 'स्कॅनिंग' शोधा. ब्लूटूथ आणि वाय-फाय स्कॅनिंग बंद करा. लोकेशन आणि मायक्रोफोन परवानग्या काढून टाका. हे करण्यासाठी सेटिंग्जमध्ये, प्रायव्हसी अंतर्गत परमिशन मॅनेजरमध्ये ज्या ॲप्सना लोकेशन आणि मायक्रोफोन ॲक्सेसची आवश्यकता नाही त्यांच्यासाठी Dont allow (परवानगी देऊ नका) निवडा. फास्ट चार्जिंग बंद करा. जर तुमच्या फोनमध्ये फास्ट चार्जिंगचा पर्याय असेल आणि तो जास्त गरम होत असेल, तर उन्हाळ्यात हा पर्याय बंद करा. रिफ्रेश रेट कमी करा. जर तुमचा फोन जास्त गरम होत असेल, तर 120Hz स्क्रीन असलेल्या फोनवर 60Hz वर स्विच करा. यामुळे बॅटरीचा वापर कमी होईल. चालू असलेल्या सर्व्हिसेस बंद करा. सॉफ्टवेअर इन्फॉर्मेशनमध्ये, बिल्ड नंबरवर सात वेळा टॅप करा. यामुळे डेव्हलपर ऑप्शन्स चालू होतील. येथे रनिंग सर्व्हिसेस बंद करा. (टीपः काही फोनवर About device मधील Version खाली असलेल्या व्हर्जन नंबरवर टॅप करून हा पर्याय मिळू शकतो). ॲप्स अपडेट करत रहा. कधीकधी, एखाद्या बगमुळे तुमचा फोन जास्त गरम होऊ शकतो. त्यामुळे, तुमचे ॲप्स आणि फोन नियमितपणे अपडेट करण्याची सवय ठेवा.
- iOS साठी : लो पॉवर मोड चालू करा. यामुळे बॅकग्राउंड ॲप्सचा वापर थांबतो आणि बॅटरीचा वापर कमी होतो. यासाठी सेटिंग्जमध्ये जाऊन बॅटरी आणि नंतर पॉवर मोड पर्यायामध्ये लो पॉवर मोड चालू करा. बॅकग्राउंड ॲप रिफ्रेश मर्यादित करा. सेटिंग्जमध्ये जाऊन जनरल आणि नंतर बॅकग्राउंड ॲप रिफ्रेशवर जा. ते एकतर बंद करा किंवा चालू असल्यास, फक्त अत्यंत महत्त्वाच्या ॲप्ससाठीच चालू ठेवा. लोकेशन सर्व्हिसेस नेहमी चालू ठेवू नका. सेटिंग्जमध्ये प्रायव्हसी अँड सिक्युरिटी अंतर्गत, एकतर लोकेशन सर्व्हिसेस बंद करा किंवा सर्व ॲप्सच्या समोरील ऑलवेज (Always) च्या जागी व्हाईल युझिंग (While Using) किंवा नेव्हर (Never) बदला. ॲनिमेशन कमी करा. सेटिंग्जमध्ये, ॲक्सेसिबिलिटी अंतर्गत मोशनमध्ये रिड्यूस मोशन टॉगल चालू करा, म्हणजे हिरवा करा.

### या 5 गोष्टी ताबडतोब करा...

- चार्जिंग करताना तुमचा फोन जास्त गरम होत असल्यास, चार्जर काढून टाका.
- फोनवर जाड कव्हर असल्यास, ते काढून टाका.
- काही वेळ एसी किंवा पंख्याखाली ठेवून थंड हवा द्या, पण फ्रिजमध्ये ठेवणे टाळा.
- एअरप्लेन मोडवर ठेवा. कधीकधी, कमकुवत नेटवर्क सिग्नलमुळे बॅटरीचा जास्त वापर झाल्याने फोन जास्त गरम होऊ लागतो.
- फोर्स रिस्टार्ट करा. iOS मध्ये, व्हॉल्यूम अप बटण, त्यानंतर व्हॉल्यूम डाउन बटण आणि नंतर पॉवर बटण दाबून धरा. अँड्रॉइडमध्ये, पॉवर बटणासोबत व्हॉल्यूम डाउन बटण १० ते २० सेकंद दाबून धरा.
- (टीप : आयफोन 0C ते 35C तापमानात उत्तम प्रकारे काम करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. यापेक्षा जास्त तापमानामुळे कधीकधी बॅटरी ८०% पेक्षा जास्त चार्ज होऊ शकत नाही. त्यामुळे त्याला जबरदस्तीने चार्ज करण्याचा प्रयत्न करू नका. जबरदस्तीने चार्ज केल्यास बॅटरी किंवा इतर कोणत्याही भागांचे नुकसान होऊ शकते. चार्जिंग करताना फोन गादीवर किंवा चादरीवर ठेवू नका. फोन अशा ठिकाणी ठेवा जिथे बॅटरीच्या उष्णतेमुळे तो जास्त गरम होणार नाही, जसे की प्लास्टिक किंवा लाकडी टेबल.

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे प्रकार : कोणता कॅमेरा कुठे लावावा?

## खरेदी करण्यापूर्वी जाणून घ्या, मिळेल उत्तम सुरक्षा...

आजकाल बहुतेक घरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतात. बाजारात विविध प्रकारचे कॅमेरे उपलब्ध आहेत. त्यामुळे लोकांना त्यांच्या घरासाठी कोणता सर्वोत्तम आहे, याबद्दल संभ्रम निर्माण होतो. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की घराच्या वेगवेगळ्या भागांसाठी, जसे की खोल्या आणि अंगण, वेगवेगळ्या प्रकारचे कॅमेरे लावले पाहिजेत. एकच कॅमेरा सर्वत्र उत्तम प्रकारे काम करणार नाही. काही कॅमेरे घराबाहेरील वापरासाठी, जसे की अंगणासाठी, सर्वोत्तम असतात, तर काही घरातील वापरासाठी असतात. त्यामुळे, तुमच्या घरात सीसीटीव्ही कॅमेरा लावताना घराच्या कोणत्या भागासाठी कोणत्या प्रकारचा कॅमेरा सर्वोत्तम आहे, याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. आज आम्ही डोम, बुलेट आणि टरेट कॅमेऱ्यांमधील फरक स्पष्ट करणार आहोत...

- टरेट कॅमेरे : तुमच्या घरासाठी टरेट कॅमेरे सर्वोत्तम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी एक मानले जातात. त्यांना 'आयबॉल कॅमेरे' म्हणूनही ओळखले जाते. आधुनिक घरांमध्ये हे सर्वात जास्त वापरले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. ते अंगण, गाडीमार्ग आणि बाजूच्या प्रवेशद्वारांसारख्या जागांसाठी योग्य आहेत. हे कॅमेरे तिथे लावले जातात जिथे सुरक्षा सर्वात महत्त्वाची असते. आकाराने लहान असूनही, ते मोठा परिसर व्यापतात.
- डोम कॅमेरे : डोम कॅमेरे सामान्यतः घराच्या आत वापरले जातात. त्यांची लहान गोलाकार रचना छतामध्ये आणि भिंतींमध्ये सहज बसते आणि ती सहजासहजी नजरेस पडत नाही. ते बहुतेकदा लिव्हिंग रूम, गॅरेज आणि बंदिस्त जागांमध्ये बसवले जातात.
- बुलेट कॅमेरे : बुलेट कॅमेरे हे लांब पल्ल्याच्या निगराणीसाठी डिझाइन केलेले आहेत. मोठ्या आवारांसाठी किंवा ग्रामीण भागांसाठी ते सर्वोत्तम पर्याय मानले जातात. त्यांच्या मोठ्या आकारामुळे लांब पल्ल्याचे कव्हरेज शक्य होते.



# 'कॅप्चा' झाला कालबाह्य, आता 'ऑल्टचा' आला!; या नवीन तंत्रज्ञानाबद्दल जाणून घ्या...

**तुम्ही बहुधा कॅप्चाशी परिचित असाल. कोणत्याही वेबसाईटवर, तुम्ही रोबोट नाही हे सिद्ध करण्यासाठी तुम्हाला ट्रॅफिक सिग्नल, पायऱ्या आणि बसेसची चित्रे निवडावी लागतात. जेव्हा वेबसाइटवरील एखादा रोबोट आपल्याला आपण माणूस आहोत हे कबूल करण्यास भाग पाडतो, तेव्हा ही पद्धत वापरली जाते. तथापि, कॅप्चा आता कालबाह्य झाला आहे, त्याची जागा ऑल्टचाने घेतली आहे.**

ऑल्टचाला कॅप्चाचे एक सुधारित रूप मानले जाऊ शकते, जे तुम्हाला कुठेही क्लिक न करता तुम्ही खरे वापरकर्ता आहात की स्पॅम बॉट हे ओळखते. हे मूलतः एका अदृश्य ढालीप्रमाणे काम करते, जे वापरकर्त्यांच्या लक्षात न येता पार्श्वभूमीत सुरक्षा तपासणी पूर्ण करते. यामुळे वेबसाइटवरील चेकबॉक्सवर टिक करण्याचा त्रास नाहीसा होतो. म्हणूनच याला जगातील सर्वात स्मार्ट कॅप्चा किलर म्हटले जात आहे.

### कॅप्चा म्हणजे काय...




कॅप्चा ही एक प्रकारचा सुरक्षा चाचणी आहे जी फक्त माणसेच उत्तीर्ण करू शकतात, संगणक किंवा बॉट्स नाही. तुमच्या लक्षात आले असेल की अनेकदा, वेबसाइटवर लॉग इन करताना किंवा टिप्पणी करताना तुम्हाला गोंधळलेली अक्षरे प्रविष्ट करण्यास किंवा विशिष्ट प्रतिमा (जसे की बस किंवा ट्रॅफिक सिग्नल) निवडण्यास सांगितले जाते. याचा खरा उद्देश वेबसाइटला स्पॅम आणि हॅकर्सपासून वाचवणे हा आहे. खरं तर, इंटरनेटवर बॉट्स नावाचे अनेक स्वयंचलित प्रोग्राम्स आहेत, जे एकाच वेळी हजारो बनावट खाती तयार करू शकतात किंवा वेबसाइट क्रॅशदेखील करू शकतात. कॅप्चा (CAPTCHA) हे सर्व रोखण्यासाठी एक संरक्षक म्हणून काम करते आणि हे सुनिश्चित करते की स्क्रीनच्या पलीकडे एक खरी व्यक्ती बसलेली आहे, एखादे मशीन नाही.

### ऑल्टचा वेगळा कसा?




ऑल्टचाचे कार्य कॅप्चासारखेच आहे, परंतु मुख्य फरक त्याच्या कार्यपद्धतीत आहे. कॅप्चा भरण्यासाठी वापरकर्त्याला प्रयत्न करावे लागतात. यासाठी अस्पष्ट प्रतिमा ओळखणे किंवा गोंधळलेली अक्षरे टाइप करणे आवश्यक असते. याउलट, ऑल्टचामध्ये तुम्हाला काहीही करावे लागत नाही. तुमचा ब्राउझर बॅकग्राउंडमध्ये एक सोपे गणित सोडवतो. याला 'प्रूफ-ऑफ-वर्क' म्हणतात आणि हे सिद्ध करते की तुम्ही माणूस आहात. हे लक्षात घेण्यासारखे आहे की गूगलच्या reCAPTCHA सारख्या प्रणाली अनेकदा तुमच्या ऑनलाइन कृतींचा मागोवा घेतात. याउलट AltCha पूर्णपणे गोपनीयता-अनुकूल आहे. ते तुमचा मागोवा घेत नाही किंवा कोणताही डेटा गोळा करत नाही. CAPTCHA सोडवण्यासाठी १०-१५ सेकंद लागू शकतात. तुम्ही माणूस आहात हे सिद्ध करण्यासाठी AltCha पार्श्वभूमीत (background) काम करते. तुम्ही वेबसाइटचे काम पूर्ण करेपर्यंत, तुमच्या नकळत सुरक्षा तपासणी आधीच पूर्ण झालेली असते.

### भविष्यासाठी कोणती प्रणाली चांगली?

AltCha हे भविष्यासाठी सर्वोत्तम उपाय मानले जाते. खरे तर, ते गोपनीयता आणि वापरकर्ता अनुभव या दोन्ही मानकांची पूर्तता करते. अहवालानुसार, AI जसजसे प्रगत होत आहे, तसतसे जुन्या CAPTCHA मधील प्रतिमा आणि अक्षरे ओळखणे मशीनसाठी सोपे होत आहे. AltCha 'प्रूफ-ऑफ-वर्क' मॉडेलवर कार्य करते, ज्यामुळे बॉट्सना वेबसाइटवर हल्ला करणे कठीण आणि खर्चिक होते. भविष्यात ही प्रणाली मोठ्या प्रमाणावर स्वीकारली जाण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे, कमी दृष्टी असलेल्या लोकांसाठीही ती वापरण्यास सोपी आहे. AltCha ला कोणत्याही परस्परसंवादाची आवश्यकता नसते. त्यामुळे ते कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक वापरकर्त्यासाठी सारखेच काम करते. शिवाय, ते गोपनीयतेसाठी देखील सर्वोत्तम आहे, कारण ते कुकीज किंवा ट्रॅकिंगशिवाय चालते.

# राज्यात अभियांत्रिकी प्रवेश वेळेतच होणार, राज्य सामाईक परीक्षा कक्षाचा खुलासा

**मुंबई (प्रतिनिधी)** – नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून ३ मे रोजी आयोजित करण्यात आलेली नीट यूजी पेपरफुटीमुळं रद्द करण्यात आली. आता नव्यानं नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी घेण्यात येणार आहे. नीट परीक्षा लांबणीवर पडल्यानं महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशांवर परिणाम होईल अशा चर्चा सुरु झाली होती. मात्र, राज्य सामाईक परीक्षा कक्षानं अभियांत्रिकी प्रवेश वेळेतच होणार असून विद्यार्थी आणि पालकांनी संभ्रम बाळगू नये असं आवाहन केलं आहे.

राज्य सामाईक परीक्षा कक्षानं अभियांत्रिकीचे प्रवेश वेळेत होणार असल्याची माहिती दिली आहे. छएएढ २०२६ पुनर्परीक्षेमुळे राज्यातील अभियांत्रिकी व औषधनिर्माण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होणार असल्याचं वृत्त प्रकाशित झाल्यानंतर उएढ कक्षाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नीट परीक्षा रद्द झाल्याचा फटका अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांना बसण्याच्या वक्तव्यानं गोंधळ निर्माण झालेला होता. आता मात्र राज्य सामाईक परीक्षा कक्षानं स्पष्टीकरण दिलं आहे. महाराष्ट्रात नीट परीक्षेचे गुण केवळ ९ विशिष्ट अभ्यासक्रमांनासाठी ग्राह्य मानले जातात. हे ९ अभ्यासक्रम राज्यातील १७ शासनमान्य संस्थांमध्ये उपलब्ध असल्याची माहिती देखील समोर आली आहे. अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवण्यासाठी महाराष्ट्रात एमएचटी–सीईटी आणि नीट परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. यापैकी ८५ टक्के जागांवरील प्रवेश महाराष्ट्रातील सीईटीच्या आधारे पार पडतात. तर, नीट यूजी परीक्षेतील गुण १५ टक्के जागा भरण्यासाठी ग्राह्य धरतात. अखिल भारतीय कोट्यासाठी नीट परीक्षेतील गुणांचा वापर केला जातो. या स्थितीमुळं महाराष्ट्रातील अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया वेळेत पार पडण्याची शक्यता आहे.

नीट यूजी परीक्षा लांबणीवर गेलेली आहे. तर, दुसरीकडे एमएचटी–सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही. एमएचटी सीईटीचा निकाल जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होऊ शकतो. तर, नीट यूजी परीक्षेचा निकाल कधी जाहीर होणार हे २१ जूनला परीक्षा झाल्यानंतर स्पष्ट होईल. नीट यूजी परीक्षेचे गुण आवश्यक असलेले ९ अभ्यासक्रम वगळता उर्वरित अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहेत. 'नीट'च्या नियोजित वेळापत्रकानुसारच प्रवेश प्रक्रिया होणार आहे, अशी माहिती राज्य सामाईक परीक्षा कक्षाकडून देण्यात आली आहे.

# आरक्षण मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने अतिशय महत्त्वाची टिप्पणी केली आहे. जर आई आणि वडील दोघेही आयएएस अधिकारी आहेत, तर त्यांना आरक्षण कोट्याची गरजच काय? असा संतप्त सवाल कोर्टाने उपस्थित केला. जे कुटुंब आधीच आर्थिक तसेच शैक्षणिकदृष्ट्या सक्षम आहे, तरीही आरक्षणाचा लाभ घेत आहे, त्यांच्या भूमिकेवरही कोटनि प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शुक्रवारी एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण आणि सामाजिक प्रगतीवर स्पष्ट शब्दांत आपले मत मांडले. जे कुटुंब आधीच सक्षम आहे, ते अजूनही आरक्षणाचा लाभ घेत असल्याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. तसेच, पालकांचे उच्च पदस्थ असणे आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती मजबूत असते, अशा प्रकरणांमध्ये आरक्षणाची खरोखर गरज आहे का? असा थेट प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीमुळे सामाजिक प्रगती होते. त्यामुळे आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्या कुटुंबातील मुलांसाठी आरक्षणाची मागणी करणं योग्य नाही. यावर आपल्याला पुन्हा पुन्हा विचार करावा लागणार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी खालील सहि करणाऱ्यांनी मंगेश भानुदासराव गादेवार रा. गुरूवार बाजार ता.जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील महापालिका हद्दीतील सिडको येथील घर नं. अ–१२०/९०/१२ व मनपा क्र. ११–६–१००९ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३० चौ.मीटर असून सिडको बांधकाम क्षेत्र १२.८९ चौ. मीटर सेक्टर ए–१२० हे सिडको कार्यालयांतर्गत आहे. ज्याची चतुः सिमा पुढील प्रमाणे–

पूर्वेस – घर नं. अ–१२०/००/९०/१३, पश्चिमेस – पाथ वे, दक्षिणेस – ३–१२०/००/९०/१४, उत्तरेस – घर नं. अ–१२०/००/९०/१०

तसेच माझ्या मालकी ताब्यातील सिडको येथील घर नं. अ–१२०/९०/१० व मनपा क्र. ११/६/१००९ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३० चौ.मीटर असून सिडको बांधकाम क्षेत्र १२.८९ चौ.मीटर सेक्टर अ–१२० हे सिडको कार्यालयांतर्गत आहे. ज्याची चतुःसिमा पुढील प्रमाणे.

पूर्वेस – घर नं. अ–१२०/००/९०/११, पश्चिमेस – पाथ वे

दक्षिणेस – घर नं. अ–१२०/००/९०/१२, उत्तरेस – घर नं. अ–१२०/००/९०/०८ अशी आहे.

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील दोन्ही घरे अंतरिक व बाह्य हक्कासह मंगेश भानुदासराव गादेवार यांच्याकडून विकत घेण्याचा करार केला आहे. व बयाना पोटी काही रक्कम दिली आहे. तरी वरील दोन्ही घरांबाबत कोणास काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण घेवाण असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रांसह आक्षेप दाखल करावा. मुदतीनंतर कोणाचही आक्षेप नाही असे समजून या घराची रजिस्ट्री करून घेण्यात येईल.

करिता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**रामदास प्रकाश जोंधळे**
**रा. आंबेडकरनगर, नांदड मो.नं. ८०८०९५३८१९, ७४९९२७६६५२**

## नगर परिषद बिलोली कार्यालय जि.नांदेड

**निविदा सुचना**

जा.क्र./बि.न.प./स्व.वि./ 217 दि. 22-05-2026

बिलोली नगर परिषद अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरवठा करण्यासाठी ऑफलाईन पद्धतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत. ट्रॅक्टर पुरवठा चे दर सादर करत असताना ट्रॅक्टरट्रॉली + ड्रायवर + ट्रॅक्टर व ट्रॉलीचे मेंटेनन्स या सर्व बाबींचा विचार करून दरपत्रक सादर करावे. सदरील दरपत्रक नगर परिषद बिलोली कार्यालयात दि. 23-05-2026 रोजी स.11.00 वाजे पासून ते दि. 25-05-2026 सायं.16.00 वाजेपर्यंत सादर करावेत.

-स्वा-
मुख्याधिकारी
नगरपरिषद बिलोली

## जाहीर प्रगटन

मौजे फत्तेजंगपूर ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नं. १५ पैकी प्लॉट नं. ८२ ज्याची साईज लांबी – पूर्व – पश्चिम – ४० फुट व रूंदी दक्षिण–उत्तर – ३० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुटाचा प्लॉट श्री दिपक भगवानराव शिदापुरे रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड, बळीराम गणपतराव शिंदे रा. हरबळ ता. लोहा जि. नांदेड यांचेकडून प्रभाकर नागनाथ पेन्सीलवार रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा– पूर्वेस – प्लॉट नं. ८१, पश्चिमेस – रोड, दक्षिणेस – प्लॉट नं. ६३ व उत्तरेस – प्लॉट नं. ९७.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत प्रभाकर नागनाथ पेन्सीलवार यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अॅड. सावित्री जोशी | प्रभाकर नागनाथ पेन्सीलवार |
| गोकुळ निवास, | रा. सगरोळी |
| सोमेश कॉलनी नांदेड | ता. बिलोली जि. नांदेड |
| मो.नं. ९४२१७६१८९८, ९४२००९०१९८ | मो.नं. ९५१८३१२५९६ |

## अग्नी १ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**ओडिशा (प्रतिनिधी)** – भारताने आपल्या सामरिक क्षमतेत आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. ओडिशातील एकात्मिक चाचणी श्रेणी चंदीपूर येथे आज म्हणजेच शुक्रवार २२ मे रोजी अल्प पल्ल्याच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्र 'अग्नी–१'ची यशस्वी चाचणी घेण्यात आली. या यशस्वी चाचणीमुळे भारताची संरक्षण क्षमता आणि रणनीतिक प्रतिकारशक्ती आणखी मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्था संचलित

## श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण अध्यापक विद्यालय

लोंढेसांगवी, ता. लोहा जि. नांदेड

**महाराष्ट्र शासन व एन.सी.डी.ई. भोपाळ मान्यताप्राप्त कोर्स**

**डी.एल.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना २०२६-२७**

डी.एल.एड. प्रथम वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी खाजगी विना अनुदानित अध्यापक विद्यालय प्रथम वर्ष डी.एल.एड. (मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या २० टक्के जागेसाठी खाजगी व्यवस्थापन कोट्यातील पात्र उमेदवरकडून अर्ज मंगविण्यात येत आहेत. तरी पत्र उमेदवारांनी खालील दर्शवलेल्या कालावधीत आवेदन पत्र सादर करावेत.

**अर्ज विक्री** : दि. ११ .०५.२०२६ ते २५.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते सायं ५.००
**अर्ज नियुक्ती** : दि. ११ .०५.२०२६ ते २५.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते सायं ५.००
**ठिकाण** : श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण अध्यापक विद्यालय लोंढेसांगवी, ता. लोहा जि. नांदेड
**प्रवेश अर्ज शुल्क** : ओपन रु. २००/- मंगसवर्गीयासाठी रु. १०० (जातीचे प्रमाण पत्र सोबत आणावे)
**शैक्षणिक पात्रता** : उमेदवार किमान १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी., य.च.म.मु.वि. प्रथमवर्ष उत्तीर्ण ओपन ५०% व मागासवर्गीयांसाठी ४५% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
**प्रवेश क्षमता** : ५०% जागा (व्यवस्थापन कोटा १० जागा) व्यवस्थापन कोट्यातील (२०टक्के) शाखा निहाय व संवर्ग निहाय आरक्षण खालील प्रमाणे आहे

| शाखा | विज्ञान (५०%) | कला (४०%) | वाणिज्य (१०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | ०५ | ०४ | ०१ | १० |

**संवर्गनिहाय आरक्षण**

| संवर्ग | एस.सी., एस.टी. (३०%) | व्ही.जे.एन.टी. ए.बी.सी.डी. (११%) | एस.बी.सी., ओ.बी.सी. (१९%) | ओपन (५०%) |
|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | ०२ | ०१ | ०२ | ०५ |

**प्राचार्य,** श्री शंकरराव चव्हाण ग्रामीण डी.एड.कॉलेज लोंढेसांगवी, ता. लोहा जी. नांदेड
**मो. ९८२२००९६५८, ९४२३२३११९५**

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## महात्मा गांधी डी.एड कॉलेज, सिडको नवीन नांदेड ता.जि. नांदेड

**महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई भोपाळ मान्यता प्राप्त अभ्यासक्रम**

**डी.एल.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना २०२६–२७**

डी.एल.एड. प्रथम वर्ष २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी खाजगी विना अनुदानित अध्यापक विद्यालय प्रथम वर्ष डी.एल.एड. (मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या २०% जागेसाठी कोट्यातील खाजगी व्यवस्थापन पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत आहेत.

अर्ज विक्री : दि. ११.०५.२०२६ ते २५.०५.२०२६ वेळ सकाळी ११–०० ते सायं.०५–००.
अर्ज स्विकृती : दि. ११.०५.२०२६ ते २५.०५.२०२६ वेळ सकाळी ११–०० ते सायं.०५–००.
ठिकाण : महात्मा गांधी डी.एड. कॉलेज सिडको, नविन नांदेड ता.जि. नांदेड
प्रवेश अर्ज शुल्क : ओपन रू. २००/– मागासवर्गीयासाठी रू. १००/– (जातीचे प्रमाणपत्र सोबत आणावे)
शैक्षणिक पात्रता : उमेदवार किमावन १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी.; य.च.म.मु.वि. प्रथम वर्ष उत्तीर्ण ओपन ५०% व मागासवर्गीयांसाठी ४५% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
प्रवेश क्षमता : २०% जागा (व्यवस्थापन कोटा १० जागा) व्यवस्थापन कोट्यातील (२०%) शाखा निहाय व संवर्ग निहाय आरक्षण खालील प्रमाणे.

| शाखा– मराठी माध्यम–जा | विज्ञान (५०%) –०५– | कला (४०%) –०४– | वाणिज्य (१०%) – ०१– | एकूण जागा –१०– |
|---|---|---|---|---|

:: संवर्ग निहाय आरक्षण ::

| संवर्ग मराठी माध्यम | एस.सी.; एस.टी. (३०%) –०२– | व्ही.जे.एन.टी. अ.ब.क.ड. (११%) –०१– | एस.बी.सी.; ओ.बी.सी. (११%) –०२– | ओपन (५०%) –०५– |
|---|---|---|---|---|

**:: संपर्क ::**

**प्राचार्य : श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित**
**– महात्मा गांधी डी.एड.कॉलेज, सिडको नवीन नांदेड**
**मो.नं. ९८९०८०१८६७ / ७०२०८४१८५७ / ९४२००५०००**

## जाहीर प्रगटन

गणेश को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेडचे. मुळ प्लॉट व भागधारक सभासद के. अनिल राजाभाऊ निलावार यांच्या नावे असलेला प्पनॉट नं. ६० अ (३६.४४७.०३–१७०० चौ. फुट) सव्र्हे नं. ६७/६ बजिराबाद गणेशनगर, यांच्ये वारसानी श्री अमित अनिल निलावार यांनी केलेल्या विनंती अर्जा नुसार त्यांच्या वडोलाच्या नावे असलेला प्लॉट नं. ६०अ सव्र्हे नं. ६७/ वजिराबाद गणेशनगर, नांदेड. हा स्वतःच्या (श्री अमित अनिल निलावार) नावे वारसाहक्काने हस्तांतरण करण्यासाठी केलेल्या अर्जावर संस्था येणा–या संचालक मंडळाच्या सभेत निर्णय घेणार आहे. पनौट नं. ६० अ सर्व्हे नं.६७/ वजिराबाद गणेशनगर, नांदेड. (ज्याचे ३६ फुट द ४७.०३ फुट अलॉटमेंट प्रमाणे एकुण क्षेत्रफळ १७०० चौ. फुट आहे.) ज्याची चतुः सिमा :–पुर्वस :– सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ५९, दक्षिणेसः, प्लॉट नं. ६०ब, उत्तरेस प्लॉट नं. ६१अ. या चतुः सिमेतील प्लॉट नं. ६० अ सव्र्हे नं. ६७/ वजिराबाद गणेशनगर, नांदेड. हा वरील व्यक्तीच्या नावे हस्तांतरण करण्यात येणार आहे.

तरी वरील हस्तांतरण व दर्शविलेल्या जाहिर प्रगटनाबाबत संबंधीत अर्जदाराचे नातेवाईक, इतर वारसदार व हितसंबंधी (बैंक, वित्तपुरवठा करणा–या संस्था, इतर कोणास) कांही आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत पुराव्यासह आक्षेप संस्थेच्या कार्यालयात सादर करावा. अन्यतः त्यानंतर आलेले कुठलेही आक्षेप किंवा उजर आल्यास ग्राह्यधरल्या जाणार नाही.

सदरील अर्ज मंजूर करून अर्जदाराने केलेल्या विनंती अर्जानुसार प्लॉट हस्तांतर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

जाहीर प्रगटन देणार

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| यशवंत देशमुख (किल्लेवडगावकर) | विजय गंभीरे |

गणेश को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर नांदेड

## Change In Name

**My old Name is SHAHENAJ ISUF SHEIKH Which now I am Changing as New Name SHAHENAAZ DASTAGIR SHAIKH. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name**
**Address: H.NO.45-2-13, KALESHWAR NAGAR, NEAR NOORANI MASJID AT POST VISHNUPURI, NANDED-431601**
**Mob: 7218649007**

## Change In Name

**My old Name is SHEIKH IRFAN SHEIKHDASTGIR Which now I am Changing as New Name IRFAN DASTAGIR SHAIKH Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name**
**Address: H.NO.558, KALESHWAR NAGAR, VISHNUPURI, NANDED-431606**
**Mob: 7218649007**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६/२०२६
**शेषाबाई व ईतर विरुध्द विश्वनाथ**

अर्जदार :- १. शेषाबाई भ्र. गंगाधर पवार, वय- ५५ वर्षे, रा. भास्कर नगर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड २. आशाबाई भ्र. अशोक जाधव, वय- ४९ वर्षे, रा. आंबेडकर नगर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड ३. अशोक पि. सखाराम काळे, वय- ४५ वर्षे, रा. इदगाह गल्ली, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड

**विरूद्ध**

गैरअर्जदार :- विश्वनाथ पि. सखाराम काळे, वय- ५७ वर्षे, रा. देशमुख नगर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड

**विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत......**

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत इंदिराबाई भ्र. सखाराम काळे यांचे अर्जदार क्र. १ व २ ह्या मुली व अर्जदार क्र. ३ व गैरअर्जदार हे मुले आहेत. अर्जदार हे मौजे बिलोली ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत इंदिराबाई भ्र. सखाराम काळे यांचा मृत्यु दिनांक दि.०८/०६/२००९ रोजी वयोमानामुळे मृत्यु झाला आहे. मयत इंदिराबाई भ्र. सखाराम काळे यांना यांना एकुण ७ आपत्य असुन त्या पैकी १. भारतबाई सुधाकर नरहरे २. राजाबाई गंगाराम पवार आणि ३. प्रल्हाद सखाराम काळे ह्या तिघांचा मृत्यु झालेला आहे. मयताचे पती हे त्यांच्या मृत्युपुर्वीच मयत झाले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार व गैरअर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत इंदिराबाई भ्र. सखाराम काळे यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १५/०६/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**सह अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली**

## नोकरीची सुवर्णसंधी

Confectionery, गोळी–बिस्कीट, मिठा पान चटणी, किराणा व पान शॉपच्या वस्तूंच्या मार्केटिंगसाठी मेहनती, हुशार व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.
कामाचे ठिकाण: नांदेड शहर व जिल्हा
पगार: रू.१५,००० ते रू.१८,००० पर्यंत
व्यवसायावर आकर्षक बोनस देखील दिला जाईल
उमेदवाराकडे स्वतःचे टू–व्हीलर असणे आवश्यक
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा:
**फ्रेंड्स जर्दा स्टोअर जुना मोंढा, नांदेड**
**मोबाईल: ८६८८९६९७५५**

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटन व्दारे कळविण्यात येते कि, ठाकुर करणसिंह चन्नुसिंह विदेह रा.गाडीपुरा नांदेड जिल्हा नांदेड यांनी खरेदी खत आधारे प्लॉट नं ३ नगर पालिका धर्माबाद मालमत्ता क्रं २/१–१२९९/ इ/६२ ज्याची लांबी पुर्व पश्चिम १५ मिटर व रूंदी उत्तर दक्षिण ९ मिटर गुंठेवारीचा नकाशा प्रमाणे असुन ज्याचे क्षेत्रफळ १३५.०० चौरस मिटर संपूर्ण मोकळी जागा आहे.

सदरील मालमत्ता ही नगर परिषद धर्माबाद हद्दीतील मौजे रत्नाळी सर्व नंबर १४/१/२,१४१/२ मधील गुंठेवारी झालेली ज्याचे प्लॉट नंबर ३

मालमत्ता नंबर २/१ १२९९/इ/६२

हे ठाकूर करणसिंग चन्नुसिंह विदेह अर्जदार यांच्या नावाने असुन खरेदी खत दस्त क्रमांक ७५३ दि.१५/५/२६ रोजी मा.दुयम निबंधक कार्यालय येथुन केलेले आहे, ज्याची चतुसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वस सर्व्ह नंबर १४१/१/ए, पश्चिम ७.६२मिटर रस्ता, दक्षिणेस प्लाट नं२, ऊतेरस प्लाट नं४ असुन या बाबत कोणास आक्षेप किंवा तक्रार असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत लेखी अर्ज पुराव्यानिशी दाखल करावा.

**अर्जदार..**
**ठाकूर करणसिंह विदेह**
**मोबाईल नंबर ८४२१४७४५९७**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. गणेश मल्लीकार्जुन वारद रा. लातुर ता. जि. लातुर मो. नं. ७९७२१४२२४२ यानी दिनाक ०५.१२.२०२५ रोजी या कार्यालयात त्यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्रचे आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव विराज गणेश वारद रा. लातुर ता. जि. लातुर या सदर व्यक्तीचा श्री. योगेश्वरी

मॅटर्निटी नर्सिंग हॉस्पीटल, बोरबन फॅक्टरी एरिया, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २९.०९.२०२३ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक ०५.१२.२०२५ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**तहसिलदार नांदेड करिता**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## मान्सूनपूर्व तयारी; महापालिकेकडून शोध व बचाव कार्याचे मॉक ड्रिल



**नांदेड (प्रतिनिधी)** –आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर शहरात उद्‌भवू शकणाऱ्या संभाव्य पूर आणि आपत्कालीन परिस्थितीचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज झाला आहे. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार शुक्रवार, दि. २२ मे रोजी अग्निशमन दलाच्या वतीने गोदावरी नदी पात्रात विष्णुपुरी काळेश्वर डॅम या ठिकाणी शोध व बचाव कार्याचे प्रात्यक्षिक म्हणजेच 'मॉक ड्रिल' यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे पूर येणे, सखल भागात पाणी साचणे किंवा नागरिक पुरात अडकणे अशा आपत्कालीन घटना घडण्याची शक्यता असते. अशा वेळी कमीत कमी वेळेत नागरिकांचे प्राण वाचवणे आणि मदत कार्य पोहोचवणे या उद्देशाने हे मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले होते. यावेळी आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना पुरातून सुरक्षित बाहेर काढण्याचे थेट प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. शोध मोहिमेसाठी स्पीड बोट, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग, अत्याधुनिक दोरखंड आणि शोध दिव्यांचा वापर करण्यात आला.

याप्रसंगी प्रामुख्याने अग्निशमन विभागाकडे असलेल्या Inflatable Rubber Baot चे प्रात्यक्षिक आणि Out Boat मशीनची प्रत्यक्ष पाण्यात तपासणी करण्यात आली.

महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, पावसाळ्याच्या दिवसात कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीची माहिती अग्निशमन विभागाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला तत्काळ द्यावी. महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून नागरिक, अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय राखला जात आहे. या मॉक ड्रिल प्रसंगी महानगरपालिकेचे उपायुक्त नितीन गाढवे, अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे, उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू प्रात्यक्षिक पार पडले. या सरावात अग्निशमन विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## नांदेडमधील मोटेगावकर क्लासेसचे बॅनर कोण काढणार? मनपा की, पोलीस विभाग!

### ◆ नांदेडकरांमधून संताप

**नांदेड (प्रतिनिधी)**–सबंध देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपर फुटीप्रकरणात आरोपी असलेला आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर सध्या सीबीआय कोठडीत असतानाही त्याचे नांदेडमधील होर्डिंग्ज नांदेडकरांच्या संतापात भर टाकणारे आहेत. हे होर्डिंग्ज महानगरपालिकेचे अतिक्रमण विभाग काढणार की, पोलीस याबाबत मात्र साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. शहरात अनेक मुख्य रस्त्यांवर त्याचे होर्डिंग्ज दिमाखात उभे आहेत.

शहरातील शिवाजीनगर उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूने आरसीसी क्लासेसच्या जाहिरातीत मोटेगावकरचा फोटो मोठ्या दिमाखाने झळकत आहे. हे बॅनर शहरातील मुख्य ठिकाणावर असताना ते काढण्याचे काम अजूनही महापालिकेने केले नाही. नांदेडमध्ये १५ मे रोजी महापालिका, पोलीस विभाग त्याचवेळी सर्व राजकीय पक्षांचे, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या उपस्थितीत अनधिकृत बॅनर संदर्भाने बैठक घेण्यात आली. या बैठकीत कोणत्याही विनापरवानगी बॅनरवर महापालिका निश्चितपणे कारवाई करेल त्याचवेळी पोलीस विभागाकडूनही थेट गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे शहरात अनधिकृत बॅनरची संख्या निश्चितपणे कमी झाली आहे.





शहरात अनधिकृत बॅनर लावल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात महापालिकेने गुन्हेही दाखल केले आहेत. हे गुन्हे एका बांधकाम व्यवसायिकावर करण्यात आले असले तरीही कोचिंग क्लासेसला मात्र महापालिका विशेष सूट देत आहे का, असा प्रश्न पुढे येत आहे. त्यातही देशभरात गाजत असलेल्या आणि सध्या सीबीआयच्या कोठडीतील संचालक मोटेगावकरचा फोटो असलेल्या बॅनरकडे महापालिका प्रशासन का दुर्लक्ष करत आहे? त्यामुळे शहरवासीय या बॅनरबाबत निश्चितपणे आश्चर्य व्यक्त करत आहेत. खाजगी ठिकाणावर असलेल्या या बॅनरवर महापालिकेच्या शिवाजीनगर क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाई केली जाऊ शकत नाही, अशी बाबही पुढे आली आहे. त्यामुळे महापालिका मुख्यालयातूनच या बॅनरवर कारवाई करणे अपेक्षित आहे. लातूरमध्ये मोटेगावकरशी संबंधित मालमत्तांची चौकशी केली जात आहे. त्याच्याविरुद्ध कारवाई सत्र सुरू आहे. असे असताना नांदेडमध्ये मात्र मोटेगावकरला अभयच मिळत आहे. हे अभय का दिले जात आहे? हाही संशोधनाचा विषय बनला आहे.

## २५ हजार लाच मागणी प्रकरणात कृषी विस्तार अधिकाऱ्यासह सेवानिवृत्तावर मुखेडमध्ये गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन विशेष घटक योजनेंतर्गत मंजूर विहिरीचा दुसरा हप्ता बँकेत जमा करण्यासाठी पंचवीस हजार रुपयांची लाच मागणारा मुखेड पंचायत समितीचा कृषी विस्तार अधिकारी अमोल राठोडसह सेवानिवृत्त कृषी विस्तार अधिकारी गणपतराव शिंदे यांच्याविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांच्याही घराची झडती घेण्यात येत असून, दोघेही फरार असल्याचे सांगण्यात आले.

मुखेड तालुक्यातील एका तक्रारकर्त्याच्या मोठ्या भावाच्या नावे कुंद्राळा येथे शेत गट क्रमांक ९२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन विशेष घटक योजनेंतर्गत विहीर मंजूर झाली होती. या सिंचन विहिरीचे काम पूर्ण झाल्यानंतर सिमेंटचे कडे टाकण्यासाठी दुसरा हप्ता दोन लाख पाच हजार रुपये पंचायत समिती मुखेडकडे येणे बाकी होते. यासाठी त्यांनी संबंधित विस्तार अधिकारी (कृषी) याच्याकडे मागणी केली, परंतु सदरची रक्कम मंजूर करून बँकेत जमा करण्यासाठी लाचखोर विस्तार अधिकारी (कृषी) अमोल राठोड याने सेवानिवृत्त विस्तार अधिकारी (कृषी) गणपतराव शिंदे यांच्यामार्फत २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली, अशी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागात आल्यानंतर पोलीस उपाधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे यांनी पडताळणी केली. पडताळणी दरम्यान पंचवीस हजार रुपये दोन टप्प्यात म्हणजेच अगोदर २० हजार व काम झाल्यानंतर ५ हजार असे घेण्याचे निष्पन्न झाले. मात्र दोघांनीही लाच स्वीकारली नाही आणि ते फरार झाले. अखेर पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे यांच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध लाचेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मार्कंडेश्वर वाळू घाटावर छापा; ५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत गोदावरी नदी पात्रातून मार्कंडेश्वर घाटावरून अवैधरित्या वाळू उपसा करून चोरीची विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत तब्बल ४९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी पहाटे मार्कंडेश्वर शिवारातील गोदावरी नदी काठावर वाळूचा अवैध उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना मिळाली होती. त्यानुसार नांदेड ग्रामीण पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी आरोपी पोलिसांना पाहून पसार झाले. कारवाईदरम्यान नदी पात्रातून वाळू काढण्यासाठी वापरण्यात येणारे ४० तराफे, ४० ब्रास वाळू, वाळू उपशासाठी वापरले जाणारे ९ इंजिन तसेच ५ ब्रास वाळू असा एकूण ४९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. काही साहित्य तेथेच जाळून



टाकण्यात आले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, मारोती पंचलिंग, हनुवता कदम, हणमंत तेलंग, समीर अहेमद, धम्मपाल कांबळे आणि विनोद पवार यांनी केली. कारवाई करणाऱ्या पोलीस पथकाचे वरिष्ठांकडून कौतुक करण्यात आले.

## नांदेड केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनची निवडणूक अखेर रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक निवडणूक प्रक्रियेबाबत सुरू असलेल्या गंभीर वाद, आक्षेप, प्रक्रियात्मक त्रुटी आणि पारदर्शकतेअभावी अखेर ही निवडणूक रद्द करण्यात आल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिकृत सूचनेनुसार, काही अपरिहार्य कारणांमुळे सन २०२६ ते २०२९ या कार्यकाळासाठीची निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतील त्रुटी, पात्र सभासदांची नावे गहाळ होणे, अर्ज प्रक्रियेत विसंगती, निवडक उमेदवारांबाबत वेगवेगळे निकष आणि निवडणूक प्रक्रियेतील गटबाजी या विरोधात अनेक सभासदांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सभासदांनी मांडलेल्या प्रश्नांमुळे आणि वाढत्या दबावामुळे अखेर निवडणूक प्रशासनाला ही प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागल्याची चर्चा संघटनेत सुरू आहे. ही घटना संघटनेतील लोकशाही, पारदर्शकता आणि निष्पक्षतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी असून भविष्यात नव्याने होणारी निवडणूक पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि सर्व सभासदांचा विश्वास संपादन करणारी असावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## नायगाव न.पं.च्या स्वीकृत सदस्यपदी सतीश लोकमनवार व गणेश नायगावकर बिनविरोध

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव नगरपंचायतीच्या दोन स्वीकृत सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया शुक्रवार, दि. २२ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी तथा पीठासन अधिकारी क्रांती डोंबे यांच्या अध्यक्षतेखाली



झालेल्या विशेष बैठकीत नायगावचे प्रसिद्ध उद्योजक सतीश लोकमनवार व सामाजिक कार्यात सक्रिय असलेले गणेश नायगावकर यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकृत सदस्य निवडीसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करून या प्रक्रियेसाठी उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांची नियुक्ती केली होती. नायगाव नगरपंचायत सभागृहात विशेष बैठक घेण्यात आली. दोन जागांसाठी केवळ सतीश लोकमनवार व गणेश नायगावकर यांचे अर्ज प्राप्त झाल्याने दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले. या निवडीमुळे नगरपंचायतीला अनुभवी, अभ्यासू व विकासाभिमुख व्यक्तिमत्त्वांची साथ लाभणार असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली. शहराच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली. या बैठकीस नगराध्यक्षा अर्चना पाटील चव्हाण, उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, गटनेते सुधाकर पाटील शिंदे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

## नागरबाई अनंतवाड यांचे निधन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – लोहगाव येथील ज्येष्ठ महिला



नागरबाई मारोती अनंतवाड यांचे शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर शनिवार, दि. २३ मे रोजी सकाळी १० वाजता बिलोली तालुक्यातील लोहगाव फाटा येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ६ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या गणपत अनंतवाड यांच्या मातोश्री तर हनुमंत दिगांबर अनंतवाड यांच्या आजी होत.

## अवैध व्यवसायविरोधी मोहिमेत १२१५ गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –दि. १ ते ३१ मे २०२६ दरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका/जुगार, अवैध दारू विक्री, अवैध शस्त्र व इतर अवैध व्यवसायांचे विरोधात मोहीम उघडली आहे.

या मोहिमेअंतर्गत, दि. १ ते २१ मे २०२६ दरम्यान संपलेल्या तिसऱ्या आठवड्यात नांदेड परिक्षेत्रात गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहितेअंतर्गत २२, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत २६१, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये ७१० व शस्त्र अधिनियमान्वये ६२, तर इतर अधिनियमाखाली १६०, अशा एकूण १२१५ कारवाया करून १६५२ इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १६,५४,३७,३४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## शिवाजीनगर आणि हिमायतनगर हद्दीत दोन मटका बुक्कीवर कारवाई; १५ जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्यात कुठल्याही परिस्थितीमध्ये अवैध धंदे चालू देणार नाही, असा सज्जड इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध व्यावसायिकांना दिला होता. तरीही काहीजण पोलिसांना चकमा देत मटका बुकी चालवत होते. अशा तीन ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी कारवाई करून तब्बल १५ जणांना अटक केली. त्यांच्याकडून एक लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत अवैध मटका जुगार, अंमली पदार्थ तसेच अवैध धारदार शस्त्रे व अग्निशस्त्रे यांचे विरोधात कठोर व प्रभावी कारवाई करून संबंधित गुन्ह्यातील मूळ सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याबाबतची मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आपले सहकारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, साईनाथ पुयड आणि नागनाथ तुकडे यांचे पथक तयार करून शहराच्या शिवाजीनगर, हिमायतनगर व अन्य भागात गस्तीवर पाठवले.

गुरुवा, दि. २१ मे रोजी नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीतील नवीन मोंढा परिसरातील संतोष बिज भांडार समोर लिंबाच्या झाडाखाली मोकळ्या जागेत एकजण मटका खेळत व खेळवित असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा कारवाई करून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून जुगाराचे साहित्य व नगदी असा एकूण १ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच मूळ सूत्रधार अब्दुल अब्बास अब्दुल गफुर रा. नई आबादी शिवाजीनगर नांदेड, शेख जमीर शेख बाबु रा. नई आबादी शिवाजीनगर नांदेड यांच्यासह ३ जणांविरुद्ध भाग्यनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच पोउपनि मिलींद सोनकांबळे व त्यांच्या पथकातील अंमलदार शिवाजीनगर हद्दीतील नई आबादी भाजी मार्केट चौकात सार्वजनीक रोडवर कांही जण मटका खेळत व खेळवित असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा कार्यवाही करून ३ जणांना ताब्यात घेवून त्यांच्याकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा १ हजार ७७० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच मुळ सुत्रधार अब्दुल अब्बास अब्दुल गफुर रा. नई आबादी, शिवाजीनगर, नांदेड याच्यासह ४ जणांविरूध्द शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. २२ मे रोजी सपोनि विठ्ठल घोगरे व पोउपनि साईनाथ पुयड यांच्या पथकातील अंमलदार यांना हिमायतनगर ठाण्याच्या हद्दीत हिमायतनगर येथे कुणाल राठोड याच्या शेतातील आखाड्यावर मोकळ्या जागेत काहीजण तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा कारवाई करून ८ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व दोन स्कुटी असा १ लाख २७ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड चाचणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र खो-खो आसोसिएशनच्या वतीने राज्य अजिंक्यपद (राज्यस्तरीय) स्पर्धा कुमार व १८ वर्षे खालील मुले यांची ५ जून रोजी जिल्हा सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी नांदेड जिल्हा संघाची निवड चाचणी दि. २४ मे रोजी सकाळी ७ वाजता क्रीडा संकुल सिडको नवीन नांदेड येथे घेण्यात येणार आहे. तरी इच्छुक खेळाडूंनी व क्रीडा-प्रेमींनी या निवड चाचणी क्रीडा स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष माजी मंत्री डी. पी. सावंत, सचिव प्रा. डॉ. रमेश नांदेडकर, जे. ई. गुपिले, रघुनाथ शिंदे यांनी केले आहे.

## अर्धापूर न. पं.च्या स्वीकृत सदस्यपदी राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे यांची बिनविरोध निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – नगरपंचायतीचे स्वीकृत नगरसेवक म्हणून पत्रकार राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे यांच्या नावाला माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजयाताई चव्हाण यांनी सहमती दिली आहे. त्यानुसार शुक्रवार, दि.२२ मे रोजी दोनच अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध होत असल्याची घोषणा निवडणूक अधिकारी, उपजिल्हाधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी करताच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला.

अर्धापूर नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी डॉ. सचिन खल्लाळ,



मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्याकडे राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे या २ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल केल्यामुळे बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्वाचन अधिकारी डॉ. खल्लाळ यांनी केली.

नगरपंचायतीमध्ये सत्ताधारी शहरी विकास आघाडीचे दोन स्वीकृत सदस्य झाल्यामुळे माजी सभापती किशोर स्वामी, नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखान पठाण, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, गटनेत्या सौ. शालिनी शेटे, सौ.डॉ. पल्लवी लंगडे, सौ. कान्होपात्रा माटे, सौ. मीनाक्षी राऊत, यास्मीन सुलताना अ. मुस्वीर खतीब, सायरा बेगम काजी, नगरसेवक बाबुराव लंगडे, सोनाजी सरोदे, नामदेव सरोदे, सलिम कुरेशी आदी नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीत एमआयएमचे ३, राष्ट्रवादीचे शेख जाकीर हे अनुपस्थित होते. पत्रकार राजू देशमुख व सामाजिक कार्यकर्ते अमोल डाढाळे यांची बिनविरोध निवड झाल्याने माजी सभापती, तालुका प्रभारी किशोर स्वामी, भाजप तालुकाध्यक्ष बालाजीराव गव्हाणे, चेअरमन प्रवीण देशमुख, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, सोशल मीडियाचे तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब, संचालक व्यंकटराव साखरे, प्रल्हादराव माटे, डॉ.विशाल लंगडे, नगरसेवक गाजी काजी, मुस्वीर खतीब, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, दिलीप डाढाळे, व्यंकटी राऊत, बबनराव लोखंडे, नितीन डाढाळे, शिवराज डाढाळे, बाळू माटे, शंकर डोलारकर, आकाश साखरे, अझर काजी यांच्या सह अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित स्वीकृत सदस्य देशमुख व डाढाळे यांच्या निवडीचे जल्लोषात स्वागत करत फटाक्यांची आतिषबाजी केली.

## विविध गंभीर गुन्ह्यातील आरोपी एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरासह लातूर जिल्ह्यात दहशत माजवून खुनासारखे गंभीर गुन्हे करून अटकपूर्व जामीन नसलेल्या गुन्ह्यात पोलिसांना चकमा देत फरार असलेल्या सांगवी येथील रवी रमेश हडसे याला आसना बायपास ब्रिजखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी अटक केली. त्यानंतर त्याला लातूर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

नांदेड शहरामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपल्या सहकाऱ्यांना पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक मिलिंद



सोनकांबळे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत शहरात फरार व पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी रवाना झाले. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आसना बायपास सांगवी ब्रिजखाली जळकोट जिल्हा लातूर येथे खुनाच्या गुन्ह्यात सहभागी असलेला सांगवी त्रिरत्ननगर येथील रवी रमेश खडसे (वय ३४) हा थांबल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी शिताफिने त्याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याच्याविरुद्ध उदगीर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल होता. पोलिसांनी लातूर पोलिसांना बोलावून त्यांच्या स्वाधीन केले आहे. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी कौतुक केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com